K L THAKUR
AND SONS SARAF
Since 1928
Gold | Silver | Diamond
3209, Bagwanpur,
Kamod Road,
Nasik-422001
0253-2505488 | 2504258

नाशिक जिल्ह्यातील सर्वाधिक खपाचे पहिले सायंदैनिक

किंमत २

# भ्रमर

BHRAMAR

Physioflex.
Working towards healthy lifestyle
Physiotherapy Clinic & Fitness Studio
Dr. Moinuddin Farooque (CEO physioflex)
PHYSIOTHERAPIST (M.S.PT.)
9021756646 8329099901
Physiofit Clinic, Shop Number 2, Jumma Masjid, Naikwadi Pura, Patil Gali, Old Nashik
Shivraya Multi Speciality Hospital, DGP Nagar 2, Ambad Link Rd., Near Mauli Lawns, Kamatwade, Nashik

वर्ष ५३ वे, अंक १९०
Year : 53, Issue No. : 190

नाशिक, शनिवार दि. १३ डिसेंबर २०२५
Nashik, Saturday 13 December 2025

R.N.I. Regd. No.20904/72
Postal Reg. No. NSK/16/2024-2026

पाने ६, किंमत २ रुपये
Pages : 6, Price Rs. 2

## शाळेतील शिक्षकाचे विद्यार्थिनींशी गैरवर्तन; गावकऱ्यांनी दिला चोप

**बेळगाव (भ्रमर वृत्तसेवा):-** बेळगुंदी येथील एका शाळेतील शिक्षकाने आपल्याच शाळेतील अल्पवयीन विद्यार्थिनीसोबत गैरवर्तन केल्याचा गंभीर प्रकार समोर आला असून, या प्रकरणामुळे गावकऱ्यांनी शिक्षकाला चोप दिला आहे.



या घटनेची माहिती पसरताच गावकऱ्यांनी शाळेत धाव घेत शिक्षकाला बेदम मारहाण केली. पोलिसांनी शिक्षकाला गावकऱ्यांच्या तावडीतून बाहेर काढत ताब्यात घेतले. दरम्यान, शिक्षकाला निलंबित करण्यात आले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, बेळगुंदी शाळेतील एक शिक्षक मागील काही दिवसांपासून आपल्या शाळेतील काही अल्पवयीन विद्यार्थिनींशी अवाजवी जवळीक साधण्याचा संशय व्यक्त होत होता. मोबाईलवरून अश्लिल संदेश पाठविणे, विद्यार्थिनींसोबत अनावश्यक फोटो काढणे अशा प्रकारांची चर्चा पालकांमध्ये होती. त्यानंतर एका विद्यार्थिनीने तिच्या पालकांना शिक्षकाने केलेल्या गैरवर्तनाबद्दल सांगितले. कुटुंबीयांकडून तक्रार प्राप्त झाल्यानंतर गावात याबाबतची बातमी पसरली. शाळेतील अनेक विद्यार्थिनींनी तसाच अनुभव आपल्याला आल्याचे सांगितले. यानंतर संतप्त ग्रामस्थांनी शाळेकडे कूच करत शिक्षकाला बाहेर ओढले आणि बेदम चोप दिला.

विद्यार्थिनींचा देखील रोष अनावर झाला आणि त्यांनीही शिक्षकाला बेदम मारहाण केली. घटनास्थळावरून पळ काढण्याचा शिक्षकाने प्रयत्न केला. मात्र, गावकऱ्यांनी पाठलाग करून त्याला पकडून ठेवले. काहींनी तातडीने पोलिसांना फोन करून माहिती दिली. पोलिसांनी गावात पोहोचून शिक्षकाला जीपमध्ये बसविण्याचा प्रयत्न केला असता विद्यार्थिनींनी जीपसमोर बसून शिक्षकावर तत्काळ कठोर कारवाई करण्याची मागणी केली. पोलिसांनी बराच वेळ समजूत काढल्यानंतर परिस्थिती आटोक्यात आली आणि शिक्षकाला पोलीस ठाण्यात नेले असून, पुढील तपास पोलीस करत आहेत.

## खासगी सावकाराने उकळली १७ लाखांची खंडणी

**नवीन नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :-** व्याजाने घेतलेले पैसे व्याजासह मुदतीत परत करूनदेखील एका खासगी सावकाराने १७ लाखांची खंडणी उकळल्याची घटना त्रिमूर्ती चौकात घडली.

याबाबत पोलिसांनी दिलेली अधिक माहिती अशी, की फिर्यादी किशोर माधवराव देवरे (वय ३४, रा. फडोळ मळा, अंबड शिवार) यांना इलेक्ट्रिक्चा व्यवसाय करायचा होता. त्यामुळे त्यांनी सन २०२२ व २०२३ मध्ये खासगी सावकार विजय बाळासाहेब झनकर ऊर्फ भावड्या (रा. तोरणानगर, सिडको) यांच्याकडून दरमहा दहा टक्के व्याजाप्रमाणे ७ लाख ६८ हजार ५०० रुपयांचे कर्ज घेतले होते. ही कर्जाची रक्कम देवरे यांनी फेडल्यानंतरही झनकरने व्याजासह आतापर्यंत १६ लाख ७६ हजार रुपये घेतले आहेत.

व्याजाची रक्कम वेळेवर दिली नाही, असे कारण सांगत त्याने देवरे यांची ८ लाख ५० हजार रुपये किमतीची एमएच १५ जीव्ही ९५९६ या क्रमांकाची स्विफ्ट डिझायर कार, ३ लाख ५० हजार रुपये किमतीची एमएच १५ एचव्ही ०१३३ या क्रमांकाची बुलेट, २ लाख ८० हजार रुपये किमतीची एमएच १५ एचबी ८४९४ या क्रमांकाची यामाहा आर १५, १ लाख १० हजार रुपये किमतीची एमएच १५ एचके ४३७८ या क्रमांकाची होंडा ॲक्टिव्हा, २ लाख ५० हजार रुपये किमतीची एमएच ०४ ईक्यू ०६८४ या क्रमांकाची ह्युंडाई आय-२० कार अशा एकूण १८ लाख ४० हजार रुपये किमतीच्या पाच गाड्या झनकर जबरदस्तीने घेऊन गेला. या गाड्या परत पाहिजे असतील, तर १५ लाख रुपये घेऊन ये, असे तो वारंवार सांगत होता. आरोपी विजय झनकरने व्याजाच्या रकमेची वसुली करण्यासाठी अनेकदा गुंडांसहित घरात अनधिकृतपणे प्रवेश करीत पत्नी व भाच्यासमोर देवरे यांना अर्वाच्य शिवीगाळ करीत मारहाण केली. झनकरने देवरे यांच्या पत्नीला उचलून घेऊन जाण्याची धमकी देत कुटुंबीयांना जिवे मारण्याची धमकी देऊन जबरदस्तीने १६ लाख ७६ हजार रुपये खंडणीच्या स्वरूपात घेतल्याचे देवरे यांनी फिर्यादीत म्हटले आहे.

एक दिवस झनकरने फिर्यादी देवरे यांना कारमध्ये जबरदस्तीने बसवून एटीएम सेंटरवर जात पैसे काढण्यास सांगितले. देवरे यांनी पैसे काढण्यास नकार दिल्याने झनकरने त्यांना गाडीतून ढकलून दिले. या प्रकरणी देवरे यांच्या फिर्यादीवरून झनकर व त्याच्या गुंड साथीदारांविरोधात अंबड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक विलास पडोळकर करीत आहेत.

## उद्योजकाला जिवे मारण्याची धमकी देत शर्माने घेतली चार लाखांची खंडणी

**नवीन नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :-** उद्योजकाला जिवे ठार मारण्याची धमकी देत खंडणीखोर संतोष शर्माने उद्योजकाकडून ४ लाख रुपयांची खंडणी घेतल्याची घटना अंबड एमआयडीसी परिसरात घडली.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, की फिर्यादी वैभव उद्धव जोशी (वय ५५, रा. रामेश्वरनगर, गंगापूर रोड) यांनी त्यांच्या कंपनीमध्ये काही बांधकाम केले होते. हे बांधकाम अनधिकृत असून, त्याबाबत आरोपी संतोष प्यारेलाल शर्माने जोशी यांच्याविरुद्ध एमआयडीसी कार्यालयात तक्रार देऊन कार्यालयास जोशी यांच्याविरुद्ध कारवाई करण्यासाठी नोटीस काढण्यास भाग पाडले. संतोष शर्माने नितीन थोरात यांच्यामार्फत, तसेच प्रत्यक्ष भेटून जोशी यांना जिवे यांना मारण्याची धमकी देत २५ ऑक्टोबर २०२५ रोजी दोन लाख रुपयांची खंडणी घेतली. नंतर नोव्हेंबर २०२५ च्या पहिल्या आठवड्यात शर्माने जोशी यांना सांगितले, की तुम्ही मला आताच्या आता आणखी दोन लाख रुपये द्या; नाही तर मी तुमचा गेम करीन, अशी धमकी दिली. घाबरून गेलेल्या जोशी यांनी पुन्हा शर्माला दोन लाख रुपये खंडणीस्वरूपात दिले. या प्रकरणी जोशी यांच्या फिर्यादीवरून संतोष शर्माविरुद्ध अंबड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक लाड करीत आहेत.

## भाच्याने लांबविली वृद्ध मावशीची साडेपाच तोळ्यांची सोन्याची पोत

**नवीन नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :-** साफसफाई करण्याचे सांगून मावशीच्या घरात प्रवेश करून भाच्याने मावशीची साडेपाच तोळे वजनाची सोन्याची पोत लांबविल्याची घटना अश्विननगर परिसरात घडली.

याबाबत पोलिसांनी दिलेली अधिक माहिती अशी, की फिर्यादी विमल बालाजी बाभुळकर (वय ६९, रा. तितिक्षा बंगला, अश्विननगर, अंबड) या घरात दि. २९ नोव्हेंबर रोजी सकाळी ९ वाजेच्या सुमारास एकट्या असताना त्यांच्या बहिणीचा मुलगा राजू तुळशीराम वाघोदे (वय ५०, रा. सिंहस्थनगर, सिडको) हा तेथे आला. घरात झाडूपोछा करून देतो, असे सांगत त्याने बेडवर ठेवलेली साडेपाच तोळे वजनाची २ लाख ७५ हजार रुपये किमतीची सोन्याची पोत चोरून तो निघून गेला. ही गोष्ट बाभुळकरांच्या लक्षात आल्यानंतर त्यांनी भाच्याविरुद्ध अंबड पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. याबाबत पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक विलास पडोळकर करीत आहेत.

## वृद्धेची तीन तोळ्यांची पोत युवकाने खेचली

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :-** रस्त्याने पायी जाणाऱ्या वृद्धेच्या गळ्यातील तीन तोळ्यांची सोन्याची पोत मोटारसायकलीवरून आलेल्या अनोळखी इसमांनी बळजबरीने खेचून चोरून नेल्याची घटना अमृतधाम येथे घडली.

फिर्यादी प्रतिभा रमेश चौधरी (वय ७०, रा. औदुंबरनगर, अमृतधाम, पंचवटी) ही महिला औदुंबरनगर बोर्डाजवळून कॉलनी रस्त्याने जात होत्या. त्यावेळी समोरून मोटारसायकलीवरून आलेल्या अज्ञात इसमांपैकी पाठीमागे बसलेल्या इसमाने चौधरी यांच्या गळ्यातील तीन तोळे वजनाची १ लाख २० हजार रुपये किमतीची सोन्याची पोत बळजबरीने खेचून चोरून नेली. या प्रकरणी पंचवटी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास पोलीस हवालदार भोये करीत आहेत.

## गोविंदनगरला घरफोडीत दोन लाखांचा ऐवज लंपास

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :-** अज्ञात चोरट्याने विनापरवाना घरात प्रवेश करून सोन्याचांदीच्या दागिन्यांसह रोकड असा २ लाख १४ हजार रुपयांचा ऐवज चोरून नेल्याची घटना गोविंदनगर येथे घडली.

फिर्यादी तरुण हरिष अडवाणी (रा. शीतल पॅराडाईज, गोविंदनगर, नाशिक) यांच्या राहत्या घरी अज्ञात चोरट्याने विनापरवाना प्रवेश केला व घरातील कपाटात असलेले ७० हजार रुपये किमतीचे १३ ग्रॅम वजनाचे मंगळसूत्र, ४० हजार रुपये किमतीच्या सहा ग्रॅम वजनाच्या सोन्याच्या रिंगा, ३५ हजार रुपये किमतीची पाच ग्रॅम वजनाची सोन्याची इअर रिंग, सात हजार रुपये किमतीची एक ग्रॅमची सोन्याची बाळी, ३५ हजार रुपये किमतीचा पाच ग्रॅम वजनाचा सोन्याचा कॉईन, दोन हजार रुपये किमतीचे चांदीचे जोडवे व २५ हजार रुपयांची रोख रक्कम असा एकूण २ लाख १४ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल घरफोडी करून चोरून नेला. या प्रकरणी मुंबई नाका पोलीस ठाण्यात घरफोडीचा गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक सोनार करीत आहेत.

## घराजवळून कारची चोरी

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :-** राहत्या सोसायटीजवळ मोकळ्या जागी उभे केलेले बोलेरो पिकअप वाहन अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना पेठ रोड येथे घडली. फिर्यादी अशोक हिंमतराव देशमुख (रा. दुर्गानगर, पेठ रोड, नाशिक) यांनी राहत्या घराजवळ मोकळ्या प्लॉटमध्ये एमएच १५ एचएच ५५५५ या क्रमांकाची आठ लाख रुपये किमतीची महिंद्रा बोलेरो पिकअप गाडी उभी केली होती. ही गाडी अज्ञात चोरट्याने मध्यरात्रीच्या सुमारास चोरून नेली. या प्रकरणी म्हसरूळ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, याबाबत पुढील तपास पोलीस हवालदार शिंदे करीत आहेत.

## अपघातग्रस्त गाडी दुरुस्त करण्याचे सांगत गाडीची परस्पर लावली विल्हेवाट

### ओला शोरुममधील घटना

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :-** अपघातग्रस्त मोपेड गाडी दुरुस्त करतो, असे सांगत शोरूमच्या मॅनेजरसह इन्शुरन्स प्रतिनिधीने त्या गाडीची परस्पर विल्हेवाट लावल्याची घटना महात्मानगरच्या ओला शोरूममध्ये घडली.

याबाबत पोलिसांनी दिलेली अधिक माहिती अशी, की फिर्यादी सागर मोहन काळे (वय ४०, रा. ढिकलेनगर, पंचवटी) यांच्या एमएच १५ जेजी १७२५ या क्रमांकाच्या मोपेड गाडीचा अपघात झाला होता. ही गाडी दुरुस्त करून घेतो, असे सांगत ओला शोरूमचे मॅनेजर नोमान शेख व इन्शुरन्स प्रतिनिधी संकेत तासकर यांनी काळे यांचा विश्वास संपादन केला. शोरूममध्ये मॅनेजरने हे सांगितल्याने त्याच्यावर विश्वास ठेवून काळे यांनी दुरुस्तीसाठी गाडी ओला शोरूमच्या पार्किंगमध्ये लावली. दोघा आरोपींनी गाडी दुरुस्त करून देण्याऐवजी तिची परस्पर विल्हेवाट लावल्याचे काळे यांना समजले. आपली फसवणूक झाल्याचे लक्षात येताच काळे यांनी दोघा आरोपींविरुद्ध गंगापूर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक पाटील करीत आहेत.

## साधुग्रामसह हजार एकरमध्ये होणार जलवाहिन्यांचा विस्तार

### मुकणे धरणातून पाणीपुरवठा : अडीचशे कोटींचा खर्च अपेक्षित

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :-** सिंहस्थापूर्वी सिंहस्थ प्राधिकरण व नाशिक महानगरपालिका प्रशासनावर महत्त्वाची कामे मार्गी लावण्याचे आव्हान राहणार आहे. दरम्यान, मुकणे येथून थेट साधुग्राममध्ये गुरुत्ववाहिनीद्वारे जलवाहिनी आणली जाणार असून, लवकरच या कामाला सुरूवात होणार आहे. परंतु मुकणेचे पाणी साधुग्रामपर्यंत आणल्यानंतर तेथून हे पाणी आखाड्यातील साधु-महंतापर्यंत घेऊन जाण्यासाठी तब्बल हजार एकरमध्ये जलवाहिन्यांचा विस्तार केला जाणार आहे.

परंतु वृक्षतोडीमुळे महापालिकेची सध्या कोंडी झाली असून, त्यातच साधुग्रामसह उर्वरीत हजार एकर परिसरात जलवाहिन्यांच्या विस्ताराच्या कामासाठी शेकडो वृक्षांवर कुऱ्हाड चालवली जाण्याची शक्यता आहे. परिणामी पर्यावरणप्रेमी विरुद्ध मनपा प्रशासन पुन्हा एकदा संघर्ष यावरुन पेटण्याची शक्यता आहे.

या कामासाठी एका एकरसाठी पंचवीस लाख रुपये खर्च अपेक्षित असून असे हजार एकरसाठी अडीचशे कोटी खर्च अपेक्षित आहे. आगामी सिंहस्थासाठी हजार एकर जागेचे अधिग्रहण करुन साधू-महंतांची व्यवस्था केली जाणार आहे. या भागात चोवीस तास पाणी पुरवठ्यासाठी महापालिका प्रशासन अडीचशे कोटी खर्चून जलवाहिन्यांचा विस्तार करणार आहे.

साधुग्राममध्ये जलवाहिन्यांचा विस्तार करण्याचे नियोजन असले तरी पर्यावरणप्रेमीचे साधुग्राममध्ये आंदोलन सुरु आहे. नाशिक महानगरपालिका साधुग्रामधील जागेचे भूसंपादन करणार असून नांदूर परिसरातील आठशे एकर जमिनीचे अधिग्रहण करण्याच्या तयारीत आहे.

दरम्यान सिंहस्थ काळात या जागेवर विविध आखाड्यांतील साधू-महंत वास्तव्यास असतील, त्यांच्यासाठी रस्ते, स्वच्छता गृहाबरोबरच चोवीस तास पाणी पुरवण्याची जबाबदारी प्रशासनावर असेल. त्यादृष्टीने मनपाच्या पाणीपुरवठा विभागाने तयारी सुरु केली आहे. मात्र नगररचनाकडून अद्याप लेआऊट मिळालेला नाही. तांत्रिक कामे होताच पाणीपुरवठा विभाग डीपीआर तयार करेल. महाराष्ट्र जलजीवन प्राधिकरणाने तांत्रिकी मंजुरी देताच या कामाचे प्राकलन तयार केले जाईल. हजार एकरमध्ये पाणीपुरवठा करण्यासाठी नाशिक महानगरपालिकेच्या पाणीपुरवठा विभागाकडून दोन ठिकाणी वीस लाख लिटरचे जलकुंभ उभारले जाणार आहे. साधारणत: या कामासाठी पंधरा महिन्यांचा अवधी लागणार आहे. संपूर्ण साधुग्रामसह नव्याने अधिग्रहीत केल्या जाणाऱ्या परिसरात १५० मि.मि. व्यासाची लाईन टाकली जाणार आहे. नियोजनात बदल झाल्यास जलवाहिन्यांच्या व्यासाची क्षमता वाढवली जाऊ शकते.

## १५ जानेवारीपर्यंत तपोवनातील एकही झाड तोडू नये : हरित लवाद

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :-** आगामी सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी तपोवनातील साधूग्रामसाठी कायदेशीर प्रक्रिया राबविल्याशिवाय एकही झाड तोडू नये, असे आदेश पुणे येथील हरित लवादाने (पश्चिम विभाग) नाशिक महानगरपालिकेला दिले आहे. या निर्णयाचे पर्यावरणप्रेमींनी स्वागत केले असून याची पुढील सुनावणी १५ जानेवारी २०२६ मध्ये होणार आहे.

सर्वोच्च न्यायालयाचे ॲड. श्रीराम पिंगळे यांनी स्वतःच नाशिक महानगरपालिका व इतरांविरुद्ध हरित लवाद (पश्चिम विभाग) पुणे यांच्याकडे वृक्षतोडीविरोधात याचिका दाखल केली होती. लवादाने काल पारित केलेल्या अंतरिम आदेशात नाशिक महानगरपालिकेने कायदेशीर प्रक्रीया राबविल्याशिवाय एकही झाड तोडू नये, असे म्हटले आहे. तसेच नेमकी परिस्थिती काय आहे,



याबाबतचा अहवाल अर्जदारास कमिटीच्या भेटीची माहिती देऊन कमिटी स्थापन करण्याचे निर्देश दिले. तातडीने अहवाल सादर करण्यास सांगितले व सर्व जाब देणाऱ्यांना नोटीस काढून आपले म्हणणे सादर करण्यास सांगितले आहे. गेल्या काही दिवसांपासून तपोवनातील वृक्षतोडीवरून नाशिककर जनता, पर्यावरणप्रेमी, सामाजिक संस्था व महापालिका प्रशासन यांच्यात संघर्ष सुरू आहे.

वृक्षतोड होवू नये म्हणून अभिनेते सयाजी शिंदे यांनीही तपोवनास भेट देत एकाही वृक्षाला हात लावू देणार नाही, असा इशारा दिला होता. त्यानंतर मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनीही आंदोलनात उडी घेत ठराविक लोकांच्या फायद्यासाठी माइस हब आणि वृक्षतोड करण्याचा डाव रचला जात असल्याचा आरोप करण्यात आला होता. दरम्यान, हरित लवादाने आता पुढील सुनावणीसाठी १५ जानेवारी ही तारीख दिली आहे. तोपर्यंत कोणतेही झाड तोडू दिले जाणार नाही, असेही हरित लवादाने आपल्या आदेशात म्हटले आहे.

## लुटेरी दुल्हनने २७ वर्षीय तरुणाला फसवले

**मनमाड (भ्रमर वार्ताहर) :-** सध्या विवाहाची समस्या जटील झाली आहे. मुलांना विवाह करण्यासाठी मुली मिळत नसल्याने अनेक अडचणींना सामोरे जावे लागते. त्यातून 'लुटेरी दुल्हन' असे किस्से देखील घडले आहे. एजन्टामार्फत फसवणुकीचे प्रकारही झालेले आहे. असाच प्रकार मनमाड शहरानजीक घडला.



एका २७ वर्षीय मुलाचा मुली सोबत एजन्टने विवाह लावून दिला. नंतर मात्र आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आल्याने खळबळ उडाली असून या प्रकरणी मनमाड पोलीस ठाण्यात एजन्टसह दहा व्यक्तींवर फसवणुकीसह विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या प्रकरणी शहरापासून जवळच असलेल्या वंजारवाडी येथील २७ वर्षीय कृष्णकांत भाऊसाहेब गुंडगळ यांनी पोलिसांत फिर्याद दिली आहे. त्यात म्हटले आहे की, परिवारातील लोक माझ्या विवाहासाठी मुलीचा शोध घेत होते. कोणी तरी माझ्या वडिलांना अशोक तान्हाजी काळे (रा. बोरसर, ता. वैजापूर, जि. संभाजीनगर) यांचा मोबाईल नंबर दिला. त्यांच्याशी संपर्क साधला. त्यांनी एक स्थळ सुचवले. मुलगी गरीब आहे. तीच्या घरच्यांना आर्थिक मदत करावी लागेल, असे सांगून १ लाख ८० हजार रूपये देण्याचे ठरले. त्यांनी राणी सुखदेव पवार (वय २३, रा. दत्त कॉलनी, निफाड, जिल्हा नाशिक) नावाची मुलगी दाखवली. पसंतीचा कार्यक्रम झाल्यावर नाशिक येथे विवाह झाला. दुसऱ्या दिवशी काही व्यक्ती आमच्या घरी आले. हे माझे आई, दोन बहिणी व त्यांचे पती आहे, असे सांगितले.

११ डिसेंबर रोजी पत्नी राणी ही तिच्या दाजी सोबत मोटारसायकलवर पळून गेली. तिने दिलेला पत्ताही खोटा असल्याचे लक्षात आले. जे लोक पत्नीचे नातेवाईक बनून आमच्या घरी आले होते. त्यांच्याकडे विचारणा केली असता त्यांनी उडवाउडवीची उत्तरे दिली. माझ्या सोबतच आमच्या गावातील सागर बाळासाहेब जाधव (रा. कातरणी सध्या रा. वंजारवाडी, ता. नांदगाव) याला सुध्दा एजन्ट अशोक काळे याने कोमल अशोक तांबे (वय २८) हिच्याशी विवाह लावून दिला. पण या पूर्वीच कोमल हिचा दुसऱ्या ठिकाणी विवाह झालेला आहे. त्यामुळे माझी व आमच्या गावातील सागर बाळासाहेब जाधव यांची अशोक तान्हाजी काळे याने फसवणूक करण्याच्या इराद्याने प्रत्येकी १ लाख ८० हजार असे एकूण ३ लाख ६० हजार रूपये घेऊन राणी पवार नामक आणि खोटा पत्ता असलेल्या मुलीशी विवाह लावून खोटे नातेवाईक दाखवून फसवणूक केली. याप्रकरणी आरोपी अशोक तान्हाजी काळे, वनिता अशोक काळे (रा. बोरसर, ता. वैजापूर), राणी सुखदेव पवार (रा. मखमलाबाद, नाशिक), आशा सुरेश हुल्हारे (पंचवटी, नाशिक), मिराबाई सुखदेव पवार (निफाड), संगिता खंडू सोनवणे (पंचवटी, नाशिक), कोमल आकाश तांबे (देवळाली गाव) आणि केजरीलाल लक्ष्मीलाल राका (विरार) आणि सोनल नावाची मुलगी व इतर दाखवलेले खोटे नातेवाईक यांच्या विरूध्द फिर्याद दिली आहे.

## गोवर्धन शिवारातील खुनाचा छडा लागला

### दोघा फरारी आरोपींना बिहार व उत्तर प्रदेशामधून अटकेत

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :-** गोवर्धन शिवारातील फाशीच्या डोंगराजवळ अज्ञात व्यक्तीचा निर्घृण खून उघडकीस आल्यापासून अवघ्या २४ तासांत नाशिक तालुका पोलिसांनी आरोपींना गजाआड केले आहे.



नाशिक ग्रामीणचे पोलीस अधीक्षक बाळासाहेब पाटील, अप्पर पोलीस अधीक्षक अदित्य मिरखेलकर, उपविभागीय पोलीस अधिकारी वासुदेव देसले तसेच स्थानिक गुन्हे शाखेचे वरिष्ठ निरीक्षक रविंद्र मगर यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली. २९ नोव्हेंबर रोजी रात्री ८ वाजेच्या सुमारास गोवर्धन शिवारातील निर्जनस्थळी धारदार हत्याराने वार करून एका व्यक्तीची हत्या करण्यात आल्याची माहिती नाशिक तालुका पोलिसांना मिळाली होती. मृताच्या चेहऱ्यावर सुकलेल्या रक्तामुळे ओळख पटणे कठीण झाले होते. पोलीस निरीक्षक मृदुला नाईक यांनी दोन तपास पथके तयार करून अंबड व सातपूर एमआयडीसी परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासण्यास सुरुवात केली. यानंतर तपास पथकाने एमआयडीसीतील कंपन्यांना मृताचे फोटो पाठविले. ऋषिकेश पांडे (रा. सातपूर) यांनी मृताची ओळख अरविंद ऊर्फ पप्पू पशुपतीनाथ पांडे (वय ४०, रा. सातपूर, मूळ रा. भोजपूर, बिहार) अशी ओळख पटवून दिली.

दारू दुकानांतील सीसीटीव्ही फुटेज तपासताना मृतासोबत दोन संशयित मंजय पंडित व धर्मेंद्र पंडित (दोघेही मूळ बिहार) हे मोटारसायकलवरून मृतास घेऊन जाताना आढळले. गुप्त बातमी-दारामार्फत संशयित मंजय पंडितचा पत्ता मिळवत तत्काळ तपास पथक बिहारमध्ये रवाना करण्यात आले. तेथे आरोपी मंजय केशव पंडित याला अटक करण्यात आली. न्यायालयाने दिलेल्या पोलीस कोठडीत त्याने गुन्ह्यात वापरलेला चाकू, मोटारसायकल आणि रक्ताने माखलेले कपडे हस्तगत करून दिले.

मुख्य आरोपी धर्मेंद्र पंडित हा वृंदावन (उत्तर प्रदेश) येथे असल्याची माहिती मिळाल्याने दुसरे पथक तेथे रवाना झाले. अथक प्रयत्नांनंतर धर्मेंद्र शिवनारायण प्रजापती (वय २६, मूळ रा. छपरा, बिहार) यास ताब्यात घेण्यात आले. त्याला न्यायालयाने तीन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे.

या कारवाईत प्रभारी अधिकारी इन्स्पेक्टर मृदुला नाईक, सपोनी दीपक बिरारी, पोहवा गायकवाड, निलेश मराठे, चव्हाण, हरी शिंदे, अरुण रहेरे, पानझाडे, आडके, पाटील, सानप तसेच तांत्रिक विश्लेषण शाखेचे बहिरम व गिलबिले यांनी कामगिरी बजावली.




## राशीभविष्य

- **मेष** : अनावश्यक खर्च टाळायला हवा. बोलण्यातून गैरसमज संभवतात. जुनी येणी पुन्हा रखडणार आहेत.
- **वृषभ** : छोटा-मोठा प्रवास घडेल. व्यावसायिक करार लाभदायक ठरतील. स्थावर प्रश्नात लाभ होईल.
- **मिथुन** : अकारण वाद-विवाद टाळावे. भागीदारी व्यवसायात काळजी घ्यावी. महत्त्वाच्या घटना घडतील.
- **कर्क** : इतरांच्या कल्पनांना दाद द्या. स्वमताग्रह टाळायला हवा. स्थापत्य, कला क्षेत्रात प्रगती होईल.
- **सिंह** : कौटुंबिक प्रश्नांचा ताण राहील. व्यवसायात नव्या संकल्पनांना वाव मिळेल. स्पर्धांमध्ये यश मिळेल.
- **कन्या** : आजचा दिवस महत्त्वाचा राहील. व्यावसायिक करार मार्गी लागतील. प्रियजनांना दिलासा मिळेल.
- **तूळ** : कलाकारांना मानसन्मान लाभेल. प्रवासात मौल्यवान वस्तुंची काळजी घ्यावी. प्रकृती सांभाळावी.
- **वृश्चिक** : कामाचा ताण अधिक राहील. जोडीदाराचा सल्ला लाभदायक ठरेल. आर्थिक प्रश्न सुटतील.
- **धनु** : आवडीच्या छंदात रमाल. रखडलेली कामं मार्गी लागतील. आर्थिक व्यवहारात चांगला लाभ होईल.
- **मकर** : अपेक्षापूर्तीचं समाधान लाभेल. व्यवसायात नव्या समस्या निर्माण होतील. विचारानं रहायला हवं.
- **कुंभ** : उत्साहवर्धक घटना घडतील. एकाच वेळी अनेक कामं मार्गी लावू शकाल. कौटुंबिक सौख्य लाभेल.
- **मीन** : किरकोळ कारणावरून मनस्वास्थ बिघडेल. होणारी कामं रखडतील. प्रवास शक्यतो टाळावा.

स्मार्ट शॉपिंग

## लिपस्टिकची खरेदी ?

प्रसाधनांच्या यादीत लिपस्टिकला वरचं स्थान असतं. लिपस्टिकशिवाय मेक अप पूर्ण होत नाही. बाजारात लिपस्टिकचे अनेकविध प्रकार मिळतात. मॅट, ग्लॉसी, शायनी, लिक्विड आदींच्या भाऊगर्दीतून परफेक्ट शेड निवडताना बराच गोंधळ उडतो. आपल्या चेहऱ्याला, रंगाला साजेशी लिपस्टिक हवी. सौंदर्य खुलवणाऱ्या या प्रसाधनाची निवड कशी करायची? पाहू या.

✻ आपली नेमकी गरज ओळखा. क्रीम, मॅट, फ्रॉस्ट फिनिश, शिमर असे लिपस्टिकचे प्रकार बाजारात मिळतात. यापैकी कोणती लिपस्टिक निवडायची हे आधी ठरवा.

✻ लिपस्टिक निवडताना ओठांची रचना आणि त्वचेचा रंग या महत्त्वाच्या बाबी लक्षात घ्या. लिपस्टिकचा रंग ओठांवर प्रभाव टाकतो. डीप शेडमुळे ओठ मोठे दिसतात तर ब्राईट शेडमुळे लहान वाटतात.

✻ विविध प्रकारच्या आणि रंगांच्या लिपस्टिक्सची तुलना करुन पहा. इंटरनेटवर त्याविषयीच्या प्रतिक्रिया वाचा. दुकानात जाण्याआधी थोडा अभ्यास करा. ब्रँड्सबद्दल जाणून घ्या. **(क्रमश:)**

## १३ डिसेंबर

दिनविशेष

- **१९१६** : प्रख्यात मुष्टियोद्धा आची मूरे यांचा जन्म.
- **१९८६** : हिंदी, मराठी चित्रपटसृष्टीतील अभिनयसम्राज्ञी स्मिता पाटील कालवश.
- **१९९६** : क्रांतिकारक श्रीधर पुरुषोत्तम अर्थात शिरूभाऊ लिमये यांचं निधन.
- **२०१३** : दिल्लीत सरकार स्थापनेसाठी काँग्रेसने आम आदमी पक्षाला बिनशर्त पाठिंबा देण्याची तयारी दाखवली.
- **२०१६** : सायरस मिस्त्री यांना टीसीएसच्या संचालक मंडळ आणि अध्यक्षपदावरून काढलं.

व्हॉट्स न्यू?

## पहिली इलेक्ट्रिक बोट

'कँडेला स्पीडबोट एबी' या स्वीडिश कंपनीने जगातली पहिली इलेक्ट्रिक बोट तयार केली आहे. 'कँडेला ७' नावाच्या या बोटीची किंमत २,४५,०० डॉलर इतकी आहे. २५ फूट लांबीच्या या 'कँडेला ७' मध्ये एका वेळी पाच प्रवासी बसू शकतात. ३४ मैल प्रतितास एवढा तिचा वेग आहे. ही बोट बनवण्यासाठी कार्बन फायबरचा वापर करण्यात आला असून पाणी कापताना अजिबात आवाज न करणं हे तिचं वैशिष्ट्य म्हटलं पाहिजे. 'कँडेला ७' एका वेळी ५० समुद्री मैल म्हणजे ५८ मैल अंतर कापू शकते. बोटीच्या पुढच्या आणि मागच्या बाजूला रिट्रेक्टेबल बसवण्यात आले आहेत. उथळ पाण्यात प्रवास करताना वेगळा मोड देण्यात आला आहे. बोटीत लिथियम आयर्न बॅटरी बसवण्यात आली असून पूर्ण चार्ज होण्यासाठी तिला १२ तास लागतात. इलेक्ट्रॉनिक बोटीमुळे ऊर्जेची बरीच बचत होऊ शकते, असा कंपनीच्या सीईओंचा दावा आहे. सध्या बाजारात इलेक्ट्रिक बोटी उपलब्ध नाहीत. एखाद-दुसरी बोट असली तरी गतीअभावी फारसा वापर होत नाही. पण इलेक्ट्रिक बोटींच्या निर्मितीचं प्रमाण वाढवून त्यांची किंमत कमी करण्याचा कंपनीचा प्रयत्न आहे. यामुळे बराच फायदा होणार आहे.

### पंचांग

**शनिवार, १३ डिसेंबर २०२५**
विश्वावसूनाम संवत्सर, शके १९४७, मार्गशीर्ष कृ. ९, चंद्रराशी : कन्या, नक्षत्र : हस्त, योग : आयुष्मान, सूर्योदय ७.०५, सूर्यास्त १८.०१

### फॉरवर्डस

**कमियाँ ढूंढ़ोगे तो मिल ही जायेग़ी ज़नाब...**

**रब क़े बन्दें हैं रब तो नहीं...!**

आरोग्यमंत्र

## औषधी लिंबाची पानं

लोणचं, कोशिंबिरीवर पिळण्यासाठी वा अन्य माध्यमातून वर्षभर आहारात समाविष्ट असणाऱ्या लिंबातील गुणधर्म आपण जाणतो, पण लिंबाच्या झाडाच्या पानांमध्येही विविध प्रकारचे गुणधर्म आहेत. तेदेखील जाणून घ्यायला हवे.

✻ लिंबाचे पान चुरुन किंवा रगडून त्याचा वास घेतला तर डोकेदुखीमध्ये आराम पडतो. म्हणूनच डोकेदुखी वा अर्धशिशी असेल तर लिंबाच्या पानाचा हा प्रयोग करून तुम्ही ठीक होऊ शकता. यासाठी लिंबाची पाने हातावर रगडून पाच मिनिटे त्याचा वास घ्या. यामुळे तुम्हाला आराम मिळेल. ✻ ही पाने चेहऱ्यावरील डाग, खड्डे, मुरूमे दूर करण्यासाठीही फायदेशीर ठरतात. हे लाभ मिळवण्यासाठी लिंबाची पाच ते सहा छोटी पाने घेऊन वाटा आणि त्यात



मध मिसळून चेहऱ्यावर लावा. दिवसातून एकदा हा प्रयोग केल्यास चेहऱ्यावरील सुरकुत्या, डाग, मुरूमे दूर होतील आणि चेहरा चमकदार होईल. ✻ लिंबाच्या पानांचे आणखी बरेच फायदे आहेत. त्वचारोग, खाज, खरूज, नायटा, फोड आदींचा त्रास असेल तर तो दूर करण्यासाठी लिंबाच्या पानांचा वापर हे उत्तम औषध आहे. त्यासाठी एक साधा प्रयोग करून बघा. पाने वाटून त्याची पेस्ट करा. आता त्यात थोडा कापूर आणि कडुनिंबाचे तेल मिसळा. एक चिमुट हळद घाला. सगळे घटक एकत्र मिसळा आणि खाज, खरूज, नायटा असणाऱ्या जागी ही पेस्ट लावा. कोणत्याही त्वचारोगात हा लेप खूपच फायदेशीर आहे.


### फॅशन पॅशन

✻ बॉंबर जॅकेट हा प्रकारही हिट आहे. हा प्रकार तुम्हाला स्टायलिश लूक देतोच शिवाय त्याची फारशी देखभालही करावी लागत नाही. बॉंबर फार महाग नसतात. मुख्य म्हणजे हा प्रकार कोणत्याही कपड्यांवर शोभून दिसतो. ✻ डेनिम जॅकेट्स तर सर्वोत्कृष्ट ठरतात. विशेष म्हणजे ती आरामदायी आणि स्वस्त असतात. कॅज्युअल किंवा स्मार्ट कॅज्युअल लूकला चार चाँद लावण्यासाठी तुम्ही एखादं डेनिम जॅकेट घ्यायलाच हवं. ✻ हूडीज हा प्रकारही हिट आहे. हूडीज आरामदायी आणि स्टायलिश असतात. हा प्रकार अगदी सहज कॅरी करता येतो. हूडीज कशावरही घालू शकता.

करिअरवाटा

## बायोमेडिकल इंजिनिअरसाठी...

डॉक्टरांना लागणाऱ्या साधनांचा विकास, निर्मिती आणि देखभाल यासाठी म्हणून वैद्यकीय आणि अभियांत्रिकी या दोन्ही शाखांचा मिलाप घडवून बायोमेडिकल इंजिनिअरींग हे शास्त्र विकसित झालं. या शाखेचं शिक्षण घेतलेले पदवीधर आणि तंत्रज्ञ अनेक प्रकारांनी डॉक्टरांना उपयुक्त काम करू शकतात. सध्या वैद्यकीय व्यवसायात निरनिराळ्या प्रकारच्या साधनांचा वापर



वाढत आहे. अशी साधने जास्त असतील तितका त्या दवाखान्याकडे रुग्णांचा ओढा असतो. म्हणून अशा रुग्णालयात डॉक्टरांच्या इतकंच बायोमेडिकल इंजिनअर्स आणि परिचारिकांइतकंच बायो मेडिकल तंत्रज्ञ आवश्यक ठरत आहेत. या कामाच्या पहिल्या प्रकारात साधनांचा विकास आणि संशोधन तर दुसऱ्या प्रकारात दुरुस्ती, देखभाल या गोष्टी येतात. ही पदवी घेणाऱ्या विद्यार्थ्याला वैद्यकीय शाखेचं आणि अभियांत्रिकी शाखेचंही तेवढंच ज्ञान असतं. त्यामुळे वैद्यकीय निदानासाठी नवनवी साधनं शोधून काढून ती विकसित करण्याचे काम संशोधक बुद्धी असणारा बायोमेडिकल इंजिनअर करू शकतो. किंवा अशा प्रकारची साधनं विकसित करण्यासाठी स्थापित एखाद्या संस्थेत संशोधक म्हणून नोकरी करू शकतो. विविध रुग्णालयांमधील साधनांची देखभाल, दुरुस्ती करण्याची नोकरी मिळवू शकतो. सध्या बायोमेडिकल इंजिनिअर्सची गरजही वाढत आहे. बदलत्या काळाची ही गरज वेळीच लक्षात घ्यायला हवी.

खेचाखेची

## खूप पुढे जाशील

एसटीत बसलेल्या कॉलेजातील मुलीला कंडक्टर म्हणाला, बाळा तुझ्या हातात हा जो स्मार्ट फोन आहे ना, त्याच्यामुळे तू तुझ्या आयुष्यात... अजून खूप पुढे जाशील!

मुलीला खूप आनंद झाला.
ती म्हणाली, अरे व्वा काका, पण तुम्हाला असे का वाटले ?

कंडक्टर म्हणाला, कारण बाळा, तुझा स्टॉप जाऊन अर्धा तास झालाय.

### वेगळं काही

मध्यंतरी पॅरिसमध्ये झालेल्या लिलावात एका व्यक्तीने १४ फूट उंचीचा जिना खरेदी करण्यासाठी तब्बल १.३२ कोटी रुपये मोजले. हा जिना आयफेल टॉवरच्या दुसऱ्या अणि तिसऱ्या मजल्याचा भाग होता. अर्थात असं पहिल्यांदाच घडलेलं नाही. २०१६ मध्ये एका आशियाई इसमाने टॉवरच्या जिन्याचा एक भाग तब्बल ४.१६ कोटी रुपयांना खरेदी केला होता. त्याला अवघ्या १४ पायऱ्या होत्या. ३२४ मीटर उंच आयफेल टॉवर फ्रेंच इंजिनियर गुस्ताव एलिल यांच्या संकल्पनेतून साकारला. वरच्या मजल्यांवर जाण्यासाठी पूर्वी या जिन्यांचाच वापर होत असे. १९८३ मध्ये तिथे लिफ्ट बसवण्यात आली. तेव्हापासून जिन्यांना ऐतिहासिक महत्त्व प्राप्त झालं.

फॅशन पॅशन


## करा हटके स्टाईल



सध्याच्या वेगाने बदलणाऱ्या फॅशनेबल जमान्यात वॉर्डरोबमध्ये नवनव्या वस्त्रांची भर पडावी असं अनेकींना वाटतं. त्यात वेगवेगळ्या स्टाईलच्या, फॅशनच्या कुर्त्यांचा समावेश असतो. पण हेच कुर्ते तुम्ही जीन्सवरही कॅरी करू शकता. फक्त सिंपलच नाही तर ट्रेंडी कुर्तेही जीन्सवर शोभून दिसतात. ही स्टाईल कशी साधायची? पाहू या.

✻ सध्या फ्रंट ओपन कुर्त्यांची चलती आहे. सिगारेट पँट किंवा पलाझोबरोबर तसेच जीन्सवरही हे कुर्ते घालता येतील. डिस्ट्रेस्ड किंवा बॉयफ्रेंड जीन्सवरही असे कुर्ते शोभून दिसतील. ✻ सध्या हाय अँड लो कुर्त्यांची फॅशन आहे. हा प्रकारही जीन्सवर घालता येतो. त्यावर स्टेटमेंट नेकलेस किंवा कानातलं घालून इंडो-वेस्टर्न लूक मिळवता येतो. ✻ पेप्लम ही एक वेगळी स्टाईल आहे. या स्टाईलचे शॉर्ट कुर्ते आणि फ्रॉक्स मिळतात. ते घेरदार असतात. हा प्रकार जीन्सवर खुलून दिसतो. ✻ अनारकली कुर्त्याला ट्विस्ट देता येईल. चुडीदार, लेगिंग्जऐवजी जीन्सवर तो घालता येईल. रिप्ड जीन्सवर तो शोभून दिसेल.

## शब्दकोडे क्रमांक २१०५



**उभे शब्द :-**
१) शिखराचे टोक
२) कट्टर, ठाम मताचा
३) पक्षांचा समुह
५) कमळ
६) तुझा (क)
७) भाताच्या रोपांचे स्थलांतर करणे
८) दणकट, मजबूत
९) उपवासाचे तांदूळ
११) प्रवाहातून वाहत आलेला गाळसाळ
१३) अनुतीर्ण
१५) गडबड, धांदल
१६) रमापती
१८) युद्ध
२१) नदीची पातळी अतिशय वाढणे
२३) लाकूड कापण्याचे हत्यार
२४) कृष्णसखी
२५) वापर
२६) बेचव, पचपचीत
२७) कर्णेंद्रिय
२८) माता पिता
२९) फळातील द्रवपदार्थ
३०) परागमातीचा कण
३५) सहस्त्रवेळा
३६) छोटी युद्धनौका (इं)
३८) छाया
४०) प्रचंड, खूप
४२) वाडगा, मोठी वाटी
४६) संगीतातील एक राग
४८) लेखणी
५०) उपदेश, विचार, मसलत
५१) एक श्वासरोग
५२) मळलेला
५४) वृद्धत्व, थोडा
५५) थोडक्यात महाराष्ट्र राज्य
५६) मुरगळा
५८) नृत्य
६०) सन्यासाचे निवासस्थान
६२) लग्न
६४) छोटासा
६५) सुप्रसिद्ध
६६) नाविकदल
६७) अटीतील दोन शब्द
६८) फुलातील सुगंधी द्रव
६९) ललाट
७२) मनाला टोचणारे दु:ख
७४) अक्षरापुढची उभी रेघ

**(उत्तर उद्याच्या अंकात)**

**आडवे शब्द :-**
१) सोने
४) वरवधुची मिरवणूक
८) गाढव
१०) पातळ खांब
१२) जगण्यासाठी गरज असलेले
१४) कमीज बरोबरचे वस्त्र
१७) कूर्म
१९) जल
२०) धष्टपुष्ट मेंढा, मोठा
२२) महिना
२३) सत्वांश
२५) पीडा, त्रास, बाधा
२६) मंत्रीमंडळ
२८) टेकू, आश्रय
३१) सोंग्ड्या मांडण्याचे वस्त्र
३२) ढेकूण
३३) आश्चर्याची गोष्ट
३४) विना उद्देश
३७) कशा प्रकारचा ? विष
३९) पलंग, खाट
४१) प्रस्थान करणे
४३) छाती
४४) मांसाचे पक्वान्न
४५) लक्ष्मीचे एक नाव
४७) अज, मेंढा
४९) रसाळ
५१) ओलसर हवा
५३) एक कोल्हापुरी दागिना
५५) ढाक्याचे मऊ कापड
५७) हार, सर
५९) वंदनाचा एक शब्द
६१) चामडे, कातडे
६३) अस्थिर, हलणारी (संपत्ती)
६५) श्वसनेंद्रिय
६६) ध्वनी
६८) कैद
७०) मोठी टोपली
७१) मनात काही उद्देश धरून केलेले काम
७२) शिव शिव
७३) पवित्र, शुद्ध
७४) आजच्या आशीचा दिवस
७५) हनुवटीवरील दाट केस
७६) कंटाळवाणी कहाणी
७७) तपस्या
७८) किनार, कड
७९) परभारे

### मागील शब्दकोड्याचे उत्तर



## देवळालीत रोटरीच्या क्लबच्या वतीने रक्तदान शिबिर



**देवळाली कॅम्प (भ्रमर वार्ताहर) :-** रोटरी क्लब ऑफ देवळाली यांच्या वतीने येथील कॅन्टोन्मेंट जनरल हॉस्पिटलमध्ये रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी १२ रक्तदात्यांनी रक्तदान केले.

रक्तदान शिबिराचे उद्घाटन कॅन्टोन्मेंट बोर्डाचे नामनिर्देशित सदस्य सचिन ठाकरे यांच्यासह रोटरीचे अध्यक्ष डॉ. पुष्कर जोशी यांच्या हस्ते झाले. यावेळी डॉ. मनीषा होनराव, डॉ. शाहू पाटील, डॉ. नरेश दौलतानी आणि डॉ. देवी लखमियानी, रोटरीचे अध्यक्ष डॉ. पुष्कर जोशी, सेवानिवृत्त ब्रिगेडियर गर्ग, सेक्रेटरी सुभाष चंद्रमोरे, डॉ. अलका स्वादी, सुंदरमन, प्रा. सुनीता आडके, मुरली राघवन, ज्योती जॉर्ज, संध्या राघवन, अनिल धवन, आमोद शहाणे आदींसह रोटरीचे सदस्य उपस्थित होते. प्रास्ताविकात रोटरी अध्यक्ष डॉ. जोशी यांनी सांगितले, की जिल्ह्यात रोटरी क्लबच्या माध्यमातून अनेक ठिकाणी महारक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले असून, देवळाली रोटरी क्लब सातत्याने हा उपक्रम राबवीत आहे. रक्तदान हे सर्वश्रेष्ठ असल्याने हे सत्कार्य करण्यासाठी प्रत्येकाने सहभाग नोंदविणे गरजेचे असल्याचे सांगितले. कार्यक्रमास रोटरी, कॅन्टोन्मेंट बोर्डव परिसरातील नागरिक उपस्थित होते. सूत्रसंचालन व आभार प्रा. सुनीता आडके यांनी केले.

## नाशिकरोड बसस्थानकात मोबाईलची चोरी

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :-** कामानिमित्त नाशिकरोड बसस्थानक येथे आलेल्या मजुराच्या खिशातील मोबाईल अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सिमोन मोझेस निर्मल (रा. मालधक्का रोड, सुभाष रोड) हा मजूर दि. २० नोव्हेंबर रोजी दुपारच्या सुमारास नाशिकरोड बसस्थानक येथे कामासाठी आला होता. त्यावेळी त्याच्या पँटच्या उजव्या खिशात ठेवलेला दहा हजार रुपये किमतीचा विवो कंपनीचा मोबाईल अज्ञात चोरट्याने खिशात हात घालून लबाडीच्या इराद्याने चोरून नेला. या प्रकरणी नाशिकरोड पोलीस ठाण्यात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास पोलीस हवालदार टेमगर करीत आहेत.

सभी शुभअंक संख्याशास्त्र और ज्योतिषशास्त्र पर आधारित है।
शनिवार
१३/१२/२०२५
कल्याण शुभअंक

| १ | २ | ३ |
|---|---|---|
| १५५ | ३९० | ३४६ |
| ४७० | २२८ | २५६ |
| १५ | २६ | ३७ |
| १७ | २८ | ३९ |


## छोटी जाहिरात

**ज्योतिष**

ज्योतिषशास्त्र, वास्तुशास्त्र व जन्मकुंडलीप्रमाणे. श्री प्रभू ज्योतिष ऋषी. **संपर्क : काश्यपी फ, मामा मुंगी कार्यालयामागे, पंपिंग स्टेशन, गंगापूर रोड, नाशिक. मो. नं. ७५०७००६३८६.**

**वाचकांना सूचना :-** भ्रमर वृत्तपत्रांतून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकुराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्याची पूर्तता जाहिरातदाराकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल भ्रमर वृत्तपत्र जबाबदार राहणार नाही कृपया याची नोंद घ्यावी.

# १०८ रुग्णवाहिकेची राज्यातील १ कोटी १४ लाख नागरिकांना मोफत आरोग्य सेवा

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी)** :- महाराष्ट्र आपत्कालीन वैद्यकीय सेवेची १०८ रुग्णवाहिका राज्यातील नागरिकांसाठी जीवनदायिनी ठरत आहे. सलग ११ वर्षांपासून 'डायल १०८ रुग्णवाहिका' राज्यातील नागरिकांना मोफत आरोग्यसेवा देत आहे. आरोग्य संजीवनी ठरलेल्या या सेवेमुळे १ कोटी १४ लाख ४७ हजार २९६ रुग्णांना मोफत सेवा देण्यात यश आले आहे. सार्वजनिक आरोग्य विभाग आणि भारत विकास समूह (बीव्हीजी इंडिया) यांच्या संयुक्त विद्यमाने ही सेवा राज्यात अव्याहतपणे सुरू आहे.




सद्य:स्थितीत राज्यात एकूण ९३७ रुग्णवाहिका कार्यरत आहेत. यात ॲडव्हान्स लाईफ सपोर्ट (ए. एल. एस.) आणि बेसिक लाईफ सपोर्ट (बी. एल. एस.) प्रकारातील रुग्णवाहिकांचा समावेश आहे. रुग्णवाहिकेत पल्स ऑक्सिमीटर, वैद्यकीय ऑक्सिजन यंत्रणा आदी सुविधांचा समावेश आहे. देशातील २४ तास डॉक्टर आणि अत्यावश्यक वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून देणारी ही एकमेव सेवा आहे.राज्यात ५ डिसेंबरपर्यंत अपघाती घटनांमध्ये १०८ रुग्णवाहिकेमधून ५,४४,२२४ रुग्णांना उपचारासाठी रुग्णालयात पोहोचविण्यात आले. त्याचबरोबर आगीच्या घटनांतील ३१,९२७, हृदयरोगातील १,०३,८८९, उंचावरून पडून जखमी झालेल्या १,५९,५५१, विषबाधेच्या २,६७,४७४, प्रसूतीवेळीच्या १७,९६,६५५ आणि शॉक किंवा वीज पडून जखमी झालेल्या ७,३९९ रुग्णांना सेवा देण्यात आली. अशा प्रकारे राज्यात १०८ रुग्णसेवेमार्फत एकूण १ कोटी १४ लाख ५८ हजार ३१६ रुग्णांना मोफत आरोग्य सेवा देण्यात यश आले आहे.

विदर्भातील गोंडवाना विभागातील गडचिरोली, चंद्रपूर, यवतमाळ, नागपूर, गोंदिया, भंडारा आणि अमरावती हे आदिवासी बहुल जिल्हे आहेत. या विभागातील १ लाख ३८ हजार ६६५ नागरिकांनी या मोफत आरोग्य सेवेचा लाभ घेतला आहे.

महाराष्ट्र आपत्कालीन वैद्यकीय सेवेची १०८ रुग्णवाहिका सेवा सुरू झाल्यापासून आतापर्यंत या रुग्णवाहिकेत ४१,५१६ बालकांचा जन्म झाला आहे, तसेच १७ लाख ९५ हजार २९२ गर्भवती महिलांना यशस्वी सेवा देण्यात आली आहे. थोडक्यात, १०८ रुग्णवाहिका सर्वसामान्य नागरिकांसाठी अमृतवाहिनी ठरत आहे.

राज्याच्या ग्रामीण भागात सर्पदंशाच्या घटना मोठ्या प्रमाणात घडतात. सर्पदंश झालेल्या १ लाख १९ हजार ८२४ नागरिकांनी १०८ रुग्णवाहिका सेवेचा लाभ घेतला आहे. यात ग्रामीण भागातील बहुतेक शेतकरी वर्गाचा समावेश आहे.

# आजपासून एसएमआरके महाविद्यालयात वार्षिक स्नेहसंमेलन

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी)** :- एस. एम. आर. के. महिला महाविद्यालयात वार्षिक स्नेहसंमेलन सुरू आहे. संस्थेच्या गुरुदक्षिणा सभागृहात नाशिककरांचे आकर्षण असलेल्या मिस एसएमआरके व्यक्तिमत्त्व स्पर्धा व विविध गुणदर्शन स्पर्धेचे आयोजन स. ९ ते १ या वेळेत केले आहे.

या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून एस. एन. डी. टी. विद्यापीठाच्या प्र-कुलगुरू डॉ. रुबी ओझा उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गोखले संस्थेच्या सचिव डॉ. प्रा. दीप्ती देशपांडे, तर विशेष अतिथी म्हणून संस्थेचे अध्यक्ष डॉ. आर. पी. देशपांडे व विभागीय सचिव डॉ. राम कुलकर्णी असणार आहेत.

आज (दि. १३) पासून ते दि. १५ या काळात महाविद्यालयात विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. त्यात प्रामुख्याने मेहंदी, टॅटू मेकिंग, रील मेकिंग, प्रश्नमंजूषा, रांगोळी, ब्रायडल मेकअप, पाककला, हॅण्डमेड हॅकेथॉन याबरोबरच पहिल्यांदाच लाईट्स कॅमेरा, ॲक्शन ही विद्यार्थिनींना अभिनयासाठी उत्तेजन देणारी वेगळी स्पर्धा आयोजित केली आहे.

मंगळवारी (दि. १६) फनफेस्ट व दरवर्षी जल्लोषात साजरा होणारा गरबा यांचे आयोजन केले आहे. तर दि. १७ व १८ तारखेला विविध क्रीडा स्पर्धा संपन्न होणार आहेत, तर १९ तारखेला वार्षिक बक्षीस वितरण समारंभ आयोजित केला आहे. यासाठी अभिनेत्री पल्लवी पटवर्धन प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहे.

या संमेलनाचे आयोजन विद्यार्थिनी सभा प्रमुख संगीता कांबळे यांनी केले आहे, अशी माहिती प्राचार्य डॉ. संध्या खेडेकर यांनी दिली. अधिकाधिक विद्यार्थिनींनी या सर्व स्पर्धांमध्ये सहभागी व्हावे, असे आवाहन उपप्राचार्य डॉ. नितीन सोनगीरकर यांनी केले.

## उद्यान कामाचे भूमिपूजन

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी)** :- प्रभाग ३० मधील कालीबाडी मंदिरासमोरील मोकळ्या जागेत आ. सीमा हिरे यांच्या निधीतून उभारण्यात येणाऱ्या भारतरत्न लता मंगेशकर उद्यान विकसित करण्याच्या कामाचे भूमिपूजन करण्यात आले. व्यासपीठावर भाजप प्रवक्ते अजित चव्हाण, माजी सभागृह नेते सतीश सोनवणे, माजी नगरसेवक ॲड. श्याम बडोदे व सुनील खोडे उपस्थित होते.

# शेतकऱ्यांचा प्रशासनाच्या प्रस्तावास तीव्र विरोध

## वाटाघाटीला तयार, टीडीआरला नकार!

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी)** :- आगामी सिंहस्थाकरिता महापालिका प्रशासनाने तयारी सुरू केली आहे. साधुग्रामधील आरक्षित जागेच्या कायमस्वरूपी खरेदीसाठी प्रशासनाने प्रयत्न सुरू केले आहेत. यासाठी मनपा प्रशासनाने शेतकऱ्यांना बोलावत काही प्रस्ताव दिले; परंतु प्रशासनाच्या प्रस्तावास साधुग्रामबाधित शेतकऱ्यांनी तीव्र विरोध करत मोबदला रोखच हवा; टीडीआर नको, अशी भूमिका घेतली आहे.

मनपा आयुक्त मनीषा खत्री यांच्या प्रमुख उपस्थितीत साधुग्राममधील उर्वरित जमिनींच्या संपादनाकरिता बैठक झाली. यावेळी अतिरिक्त आयुक्त प्रदीप चौधरी, नगररचना विभागाचे सहसंचालक कल्पेश पाटील, नगररचनाचे कार्यकारी अभियंता सचिन जाधव आदी उपस्थित होते.

दरम्यान, जमिनीचे संपादन करायचे असेल, तर बाजारभावाप्रमाणे दर द्यावा, तसेच आम्हाला रोखच मोबदला हवा. टीडीआरसह कुठलाही प्रस्ताव आम्ही स्वीकारणार नसल्याची भूमिका शेतकऱ्यांनी स्पष्टपणे आयुक्तांसमोर मांडली. आगामी सिंहस्थाच्या पार्श्वभूमीवर तपोवनात साधुग्रामसाठी २७० एकर जागेसाठी महापालिकेने ५० टक्के टीडीआर व ५० टक्के रोख स्वरूपात मोबदला देण्याचा प्रस्ताव दिला असता, तो शेतकऱ्यांनी फेटाळला आहे.

ज्या भागात अधिक रेडीरेकनरचे दर आहेत, त्यानुसारच संपूर्ण मोबदला रोख स्वरूपातच देण्यात यावा, अशी शेतकऱ्यांनी आक्रमक भूमिका घेतली. तपोवनात साधुग्रामसाठी ३५० एकरवर आरक्षण टाकण्यात आले आहे. त्यातील ९७ एकर जागा महापालिकेने ताब्यात घेतली आहे. उर्वरित जागा मोबदला देऊन ताब्यात घेण्यासाठी महापालिकेने सुमारे २८० स्थानिक शेतकऱ्यांना नोटीसा पाठवल्या. त्या अनुषंगाने महापालिकेच्या स्थायी समितीच्या सभागृहात शेतकऱ्यांचे म्हणणे ऐकून घेण्यासाठी सुनावणी घेण्यात आली. महापालिकेने शेतकऱ्यांना दिलेल्या नोटिशीत म्हटले आहे, की निधीची अपूर्तता असल्याने व आर्थिक चणचण असल्याने ५० टक्के रोख रक्कम व ५० टक्के टीडीआरने पैसे देण्यात येतील. त्यावर काही शेतकऱ्यांनी आक्षेप घेत, निधीच नाही तर सिंहस्थ कुंभमेळा कशाला करता, असा प्रश्न प्रशासनाला विचारला.

महिनाभरात पुन्हा शेतकऱ्यांची बैठक घेतली जाईल. कोणताही निर्णय हा एकतर्फी घेतला जाणार नाही. सर्व शेतकऱ्यांना विश्वासात घेऊनच मोबदला दिला जाईल. कोणी काहीही गैरसमज करू नये. भूसंपादनासाठी एका दरावर शेतकऱ्यांनी अडून राहू नये. दर कमी करा, मग त्यातून मार्ग काढता येईल. तशी प्रक्रिया सुरू करण्यात येईल. नांदूर परिसरातील भूसंपादनासाठीच्या जागांचे सर्वेक्षण महापालिका प्राधिकरणाला करून देणार आहे. प्राधिकरणाशी चर्चा करून निर्णय घेण्यात येईल, असे मनपा आयुक्त मनीषा खत्री यांनी सांगितले.

**शेतकऱ्यांचा माईसला विरोध**

साधुग्रामच्या जागेत कोणतेही काम नको, मनपा प्रशासनाने काढलेल्या २२० कोटींचे टेंडर रद्द करावे, अशी मागणी शेतकऱ्यांनी केली. तसेच ही जागा आम्हाला द्या, अशी मागणी करत याठिकाणी कोणतेही पक्के बांधकाम होऊ दिले जाणार नाही, असा इशारा शेतकऱ्यांनी दिला.

# खत प्रकल्पानजीक होऊ घातलेल्या कत्तलखान्याला ग्रामस्थांचा विरोध

**नवीन नाशिक (भ्रमर प्रतिनिधी)** :- नाशिक महानगरपालिकेच्या खत प्रकल्पाच्या लगत कत्तलखान्यासाठी आरक्षित जागेवर वॉल कंपाऊंड बांधकामास सुरुवात होताच स्थानिक शेतकरी व ग्रामस्थांनी तीव्र विरोध दर्शवून काम तत्काळ थांबविले. अनेक वर्षांपासून या आरक्षणाला विरोध होत असून, सर्व्हे क्रमांक २६४/१ मधील कत्तलखान्याचे आरक्षण रद्द करावे, अशी ग्रामस्थांची ठाम मागणी आहे. या पार्श्वभूमीवर ग्रामस्थांच्या वतीने मनपा आयुक्त मनीषा खत्री यांना निवेदन देण्यात आले.

मनपा प्रशासनाकडून वेळोवेळी दिशाभूल होत असल्याचा आरोपही निवेदनात करण्यात आला. नागरिकांनी सांगितले, की काम सुरू होताच परिसरातील रहिवासी एकत्र आले आणि कत्तलखाना उभारणीला विरोध करीत काम बंद पाडले. यापूर्वीही स्थानिकांचा विरोध बाजूला सारून काही प्रकल्प जबरदस्तीने राबविण्यात आल्याची नाराजी ग्रामस्थांनी व्यक्त केली. आरक्षण रद्द केल्याशिवाय कोणतेही काम सुरू करू नये, अशी मागणी ग्रामस्थांनी स्पष्टपणे केली. याप्रसंगी त्र्यंबक कोंबडे, निखिल पवार, मंगेश धोंगडे, सोपान जाचक, विक्रम जाचक, किरण भालेकर, गणेश बोराडे, राहुल बोराडे, संदीप चुंबळे, धनंजय ढेमसे, नितीन ढेमसे, सचिन धोंगडे आदींसह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते; मंत्रभूमी ते यंत्रभूमी अशी ओळख असलेल्या नाशिक नगरीत येत्या काही दिवसांत सिंहस्थ भरत आहे. कुंभमेळ्याला देशभरासह विदेशातून संत-महंतांसह लाखोंच्या संख्येने भाविक येणार आहेत व नाशिक शहराचे प्रवेशद्वार असलेल्या पाथर्डी शिवारात मनपातर्फे कत्तलखान्यांना जागा उपलब्ध करून दिली जात असेल, तर ते कदापिही सहन केले जाणार नाही. यापूर्वी हा लढा केवळ पाथर्डीकरांचा असला, तरी भविष्यात तो नाशिककरांसह सर्व हिंदू संघटनांचा सुरू राहील. कत्तलखान्याच्या जागेवरून भविष्यात जनआंदोलनही छेडण्यात येईल, असे ह. भ. प. राहुल महाराज साळुंके यांनी सांगितले.

# वडाळा ऊर्दू शाळेतील विद्यार्थ्यांची स्पेलिंग बी टेस्ट

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी)** :- शिक्षिका रोशन यांनी प्रशासन अधिकारी मीता चौधरी यांच्या वतीने नाशिक येथील महानगरपालिका शाळा क्रमांक ८५ वडाळा गाव येथे स्पेलिंग बी टेस्टसाठी भेट दिली. त्यांनी प्रत्येक वर्गात जाऊन लेखी आणि तोंडी स्पेलिंग बी टेस्ट घेतली. विद्यार्थ्यांनी चांगला प्रतिसाद दिला. रोशन यांनी विद्यार्थ्यांचे स्पेलिंग बी रजिस्टरदेखील तपासले. अशा प्रकारे त्यांनी पहिली ते सातवीपर्यंतच्या प्रत्येक वर्गाची टेस्ट घेतली. प्राचार्य तबस्सुम परवीन आणि महानगरपालिका शाळा क्रमांक ८५ चे शिक्षक रवीश मिर्झा, शाएश्ता खान, आफरीन काझी, मुल्ला शबनम, तहसीन शेख, तहसीन सौदागर, शेख नोशीन, मोमीन शबीना, शेख समरीन, शेख सबा, शेख शाहीन, शेख रिजवाना आणि नवाज नगीनावाले उपस्थित होते.

## भुरट्या चोऱ्यांमध्ये वाढ

**नाशिक** :- जेलरोड परिसरातील कॅनलरोड, मंगलमूर्तीनगर, लोखंडे मळा, नारायणबापूनगर, शिवाजीनगर आदी परिसरात भुरट्या चोऱ्यांमध्ये वाढ झाली आहे.




# 'मी माझ्या माणसांचा' पुस्तक प्रकाशन

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी)** :- येथील निवृत्त आयकर अधिकारी अविनाश रत्नपारखी यांनी लिहिलेल्या 'मी माझ्या माणसांचा' या त्यांच्या द्वितीय पुस्तकाचा प्रकाशन समारंभ येथील ऋग्वेद मंगल कार्यालयात पार पडला. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून कवी ऐश्वर्य पाटेकर आणि नाट्य दिग्दर्शक, अभिनेते व लेखक श्रीपाद देशपांडे उपस्थित होते. यावेळी बोलताना पाटेकर यांनीओघवत्या शैलीत आपले विचार प्रकट केले. आजच्या तंत्रज्ञानाच्या युगात पुस्तके ही जास्त प्रभावी ठरू शकतील. हे विचार मांडताना त्यांनी वरील संपूर्ण पुस्तकाचा गोषवारा रसिक वाचकांसमोर विशद केला. त्याचप्रमाणे देशपांडे यांनी पुस्तकाचे कौतुक करताना ही पुस्तके नवोदित लेखकांना नक्कीच प्रोत्साहन देतील, अशी आशा व अपेक्षा व्यक्त केली. याप्रसंगी अविनाश गोसावी यांनी मनोगत व्यक्त केले. पाहुण्यांचा सत्कार कौस्तुभ व कल्याणी तसेच गौरव रत्नपारखी यांनी केला. तर आपल्या आगळ्यावेगळ्या पद्धतीने संजीव रत्नपारखी यांनी सूत्रसंचालन केले. कार्यक्रम यशस्वितेसाठी सागर रत्नपारखी यांचे मार्गदर्शन लाभले. आभारप्रदर्शन जयंत पारळकर यांनी केले.

# डॉ. प्रकाश जोशी यांच्याकडून यशवंत व्यायामशाळेला दहा लाखांची देणगी



**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी)** :- वैद्यकीय क्षेत्रातील डॉ. प्रकाश जोशी व डॉ. ललिता जोशी यांच्या वतीने यशवंत व्यायामशाळेला भरीव देणगी देण्यात आली. त्यांनी यशवंत व्यायामशाळेत जाऊन व्यायामशाळेचे अध्यक्ष दीपक पाटील यांच्याकडे दहा लाख रुपये देणगीचा धनादेश सुपूर्द केला. यावेळी व्यायामशाळेचे संचालक डॉ. जयराम महाबळ, खजिनदार विजय खरोटे उपस्थित होते. दीपक पाटील यांनी या देणगीबद्दल डॉ. प्रकाश जोशी यांचे आभार मानले. डॉ. जोशी यांना जयराम महाबळ यांनी व्यायामशाळेच्या दैनंदिन कामकाजाची माहिती दिली.

# सुकदेव नागरे प्रतिष्ठानच्या वतीने आरोग्य तपासणी शिबिर





**सातपूर (भ्रमर प्रतिनिधी)** :- मोतीवाला होमिओपॅथिक मेडिकल कॉलेज व हॉस्पिटल व स्व. पैलवान सुकदेव नागरे प्रतिष्ठानच्या संयुक्त विद्यमाने शालेय विद्यार्थ्यांसाठी आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन मॉडर्न एज्युकेशन सोसायटी माध्यमिक विद्यालय, अशोकनगर येथे करण्यात आले होते.

या शिबिरात इयत्ता सहावी ते दहावीतील सुमारे एक हजार विद्यार्थ्यांची मोफत आरोग्य तपासणी करण्यात आली. विद्यार्थ्यांचे एकूण आरोग्य, वजन-उंची, डोळे तपासणी, तसेच सामान्य आजारांची पडताळणी करण्यात आली. आरोग्यप्रती जागरुकता निर्माण करण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला. या आरोग्य शिबिरासाठी मोतीवाला कॉलेजच्या वतीने डॉ. स्वानंद शुक्ला, डॉ. सुनील भालेराव, डॉ. पूनम हिरे, अझहर व हॉस्पिटलमधील ४० डॉक्टरांचे सहकार्य लाभले. या आरोग्य शिबिराला शाळेचे मुख्याध्यापक व शिक्षक वर्गाचे सहकार्य लाभले असून, विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या उपक्रमाचे आयोजन लक्ष्मी नागरे व इंजि. प्रवीण नागरे यांच्या पुढाकारातून स्व. पैलवान सुकदेव नागरे प्रतिष्ठानतर्फे करण्यात आले.

यावेळी प्रतिष्ठानचे पदाधिकारी अभिमन्यू गुडघे पाटील, सचिन उशीर, राहुल पाटील, पै. पंकज नागरे, अमोल पाटील, मनीष नागरे, अजिंक्य घुगे, रोहित नागरे व कृष्णा नागरे उपस्थित होते. या उपक्रमासाठी मुख्याध्यापक डॉ. अनिल माळी यांचे सहकार्य लाभले.

# देवमालेदार श्री यशवंतराव महाराज पुण्यतिथी उत्सवास प्रारंभ

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी)** :- देवमालेदार श्री यशवंतराव महाराज यांच्या १३८ व्या पुण्यतिथी उत्सवाला गोदाघाटावर सुरुवात झाली. माधवीताई गुरुगोदावरी (श्री उपासनी महाराज कन्याकुमारी स्थान साकोरी) यांच्या हस्ते समाधी पूजन करून उत्सवाचा शुभारंभ झाला.



उत्सवाच्या कालावधीत दररोज विविध धार्मिक कार्यक्रम तसेच कीर्तनाचे आयोजन करण्यात आले आहेत. सोमवारी (दि. १५) श्री महाराजांची पालखी शहरातून काढण्यात येणार आहे.

आज (दि. १३) दुपारी ४ वाजता भक्ती स्वर कार्यक्रम होईल. उद्या (दि. १४) सकाळी ९ वाजता शालेय विद्यार्थ्यांसाठी चित्रकला व हस्ताक्षर स्पर्धा होईल. दुपारी ४ वाजता श्री श्री रविशंकर यांच्या आर्ट ऑफ लिव्हिंग, नाशिकतर्फे सत्संग कार्यक्रम होणार आहे. मंगळवारी (दि.१६) साय. ५ वाजता विविध स्पर्धांचा बक्षीस वितरण समारंभ होईल. सायंकाळी ६ वाजता वेदविद्या पाठशाळेचा 'मंत्रजागर' कार्यक्रम पार पडेल.

बुधवारी (दि. १७) सकाळी ११ वाजता गोरगरिबांसाठी प्रसादाचे वाटप केले जाणार आहे. तर सायंकाळी ७ ते रात्री ८ या वेळेत हर्षदबुवा जोगळेकर (पुणे) यांचे कीर्तन होईल.

त्यानंतर उत्सवाची सांगता करण्यात येणार आहे. कार्यक्रमात संस्थेचे संतोष कुलकर्णी, मंदार लोणकर, कुमार कुलकर्णी, योगेश भोसेकर, तसेच अनेक भक्तगण परिश्रम घेत आहेत. सोमवारी (दि. १५) सकाळी १० वाजता अण्णासाहेब माळी यांचे 'देवमालेदार चरित्र' या विषयावर प्रवचन होईल. त्यानंतर श्रीमद्भगवद्गीता पाठ, दुपारी सद्गुरू भजनी मंडळाचे भजन होईल. दुपारी ४ ते सायंकाळी ५ यावेळेत प्रभुणे महाराज यांचे 'महायोग (सिद्धयोग) पूर्व अभ्यास' या विषयावर प्रवचन होणार आहे. सायंकाळी ६ ते रात्री ९ श्री यशवंत महाराजांची भव्य पालखी मिरवणूक शहरातून मार्गस्थ होईल. सायंकाळी ७ वाजता हर्षदबुवा जोगळेकर यांचे कीर्तन. रात्री ९ ते ११ सद्गुरू आध्यात्मिक ज्ञानपीठ मंडळातर्फे भजन, रात्री ११ वाजता महाआरतीने या पुण्यतिथी सोहळ्याची सांगता होणार आहे.

## बसच्या धडकेत एक जखमी

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी)** :- महामंडळाच्या बसचा धक्का लागल्यामुळे ज्येष्ठ नागरिक जखमी झाल्याची घटना ठक्कर बझार बसस्थानकात घडली. याप्रकरणी बसच्या चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# डॉ. श्रीधर वेम्बू यांच्या प्रमुख उपस्थितीत अनंत नॅशनल युनिव्हर्सिटीचा पदवीदान समारंभ

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी)** :- अनंत नॅशनल युनिव्हर्सिटीने अलीकडेच सातवा पदवीदान समारंभ आयोजित केला, ज्यामध्ये बॅचलर ऑफ डिझाईन, बॅचलर ऑफ आर्किटेक्चर, मास्टर ऑफ डिझाईन, अनंत फेलोशिप इन सस्टेनेबिलिटी ॲण्ड बिल्ट एन्व्हायर्नमेंट, एमएससी इन सस्टेनेबिलिटी अँड बिल्ट एन्व्हायर्नमेंट आणि अनंत फेलोशिप इन क्लायमेट ॲक्शन या अभ्यासक्रमांतील एकूण २९९ विद्यार्थ्यांना पदवी प्रदान करण्यात आली. या समारंभाचे मुख्य अतिथी पद्मश्री पुरस्काराने सन्मानित आणि झोहो कॉर्पोरेशनचे चीफ सायंटिस्ट व सहसंस्थापक डॉ. श्रीधर वेम्बू होते. अनंत नॅशनल युनिव्हर्सिटीचे अध्यक्ष अजय पिरामल, प्रॉवोस्ट डॉ. संजीव विद्यार्थी, तसेच बोर्डाचे सदस्य समारंभात उपस्थित होते.

पदवीधर विद्यार्थ्यांना संबोधित करताना डॉ. श्रीधर वेम्बू म्हणाले, अनंत नॅशनल युनिव्हर्सिटीत येणे माझ्यासाठी अत्यंत आनंददायी ठरले. अनंतच्या विद्यार्थ्यांची सर्जनशीलता आणि उद्देशपूर्ण डिझाईन्स पाहून मी प्रभावित झालो. मी येथे असे उल्लेखनीय कार्य पाहिले, जे आपल्या देशाला आज अत्यंत आवश्यक आहे. आपण अनेकदा भूतकाळातील उपलब्धींचा गौरव करतो, पण वर्तमानात आपण काय निर्माण करतोय याकडे कमी लक्ष देतो. आपण आपल्या



आयुष्याच्या मर्यादेपलीकडे विचार करून भविष्यासाठी निर्माण करायला हवेह्वआणि अनंत आपल्या विद्यार्थ्यांना नेमके हेच शिकवीत आहे. चांगला डिझाईन मन आणि आत्मा दोन्ही उन्नत करतो, आणि ही भावना मी या कॅम्पसमध्ये सर्वत्र अनुभवली. स्वप्ने पाहत रहा, तरुण राहा, प्रासंगिक राहा. जेव्हा आपण अहं विसरून 'छाप पाडण्याचा' प्रयत्न करीत नाही, तेव्हा आपणच सर्वाधिक प्रभाव पाडतो. समस्येवर लक्ष केंद्रित करा.ह्वअसाधारण काम आपोआप घडते.

कार्यक्रमादरम्यान अनंत नॅशनल युनिव्हर्सिटीचे अध्यक्ष अजय पिरामल म्हणाले, की डिझाईन आपल्याला उद्योगांचे पुनर्कल्पन, समुदायांचे पुनर्निर्माण आणि पर्यावरणाचे पुनरुज्जीवन करण्याची साधने देते. हे 'मेक इन इंडिया' या आकांक्षेतून 'डिझाईन फॉर इंडिया' या तत्त्वज्ञानाकडे जाण्याचा प्रवास आहे जो सर्जनशीलता, शिल्पकला आणि संवेदनशीलतेवर आधारित आहे.

● **नाशिक** :- राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते शरद पवार यांचा वाढदिवस नाशिकसह राज्यात उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी विविध उपक्रम राबविण्यात आले.

# जैन सोशल ग्रुपतर्फे २८ रोजी कृत्रिम हात शिबिर

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी)** :- जैन सोशल ग्रुपच्या वतीने पुणे येथील इनाली फाऊंडेशन आणि राजूभाई व्यास यांच्या सहकार्याने दि. २८ डिसेंबर रोजी कृत्रिम इलेक्ट्रॉनिक हात बसविण्याचे शिबिर होत आहे.

त्यासाठी गरजूंनी दि. २० डिसेंबरपर्यंत इनाली फाऊंडेशन (अभिषेक खेंगरे - ८६६८७२४००१) येथे संपर्क साधून नावनोंदणी करावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

हे शिबिर दि. २८ डिसेंबर रोजी सकाळी १० वाजेपासून काशीमाळी मंगल कार्यालय, तिगरानिया कॉर्नर, द्वारका चौक, नाशिक येथे दिवसभर होणार आहे.

शिबिराच्या यशस्वितेसाठी जैन सोशल ग्रुपचे महाराष्ट्र रिजन चेअरमन दिलीप मेहता, इनाली



फाऊंडेशनचे संस्थापक प्रशांत गाडे, सतीश पुंडे, संस्थेच्या आर्टिफिशिअल लिंब कमिटीचे चेअरमन स्वप्नील मुथा, श्रेयांस शहा, जैन सोशल ग्रुप फेडरेशनचे संचालक सचिन शहा, दिलीप चोरबेले, राजेंद्र कुम्मट, रौनक शहा, डॉ. पमिता सुराणा, राहुल शहा, राजूभाई व्यास, नरेंद्र धाडिवाल, पवन चतुरमुथा, मोहनलाल संचेती, पूनम वर्मा आदी प्रयत्नशील आहेत. अशीच शिबिरे सोलापूर, कोल्हापूर, पुणे व छत्रपती संभाजीनगर येथेही डिसेंबर व जानेवारीमध्ये आयोजित करण्यात येत आहेत.

## कमी विद्यार्थीसंख्येच्या जि. प. शाळा बंद होणार नाहीत : गोरे

**नागपूर (भ्रमर वृत्तसेवा)** :- जिल्हा परिषद शाळांमधील बदली प्रक्रियेअंतर्गत ६६ हजार ५२० शिक्षकांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत. कमी विद्यार्थी असणाऱ्या जिल्हा परिषदेच्या शाळा बंद होणार नाहीत, असे आश्वासन ग्रामविकासमंत्री जयकुमार गोरे यांनी विधानसभेत दिले. आगामी वर्षात मे अखेरपर्यंत बदली प्रक्रिया पूर्ण करण्यात येईल.

# नाशिकमध्ये स्त्रीरोगतज्ज्ञ संघटनेची राष्ट्रीय परिषद संपन्न



**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी)** :- बदलत्या तंत्रज्ञानाने वैद्यकीय क्षेत्रातही अनेक मोठे बदल केले आहेत. याच बदलावर मार्गदर्शन करण्यासाठी कार्यशाळा घेत नाशिक ऑब्स्टेट्रिक्स ॲण्ड गायनॅकोलॉजिकल सोसायटीकडून दोनदिवसीय राष्ट्रीय परिषद झाली. यावेळी हिस्टेरोस्कोपी आणि अल्ट्रासाऊंड या महत्त्वपूर्ण विषयावर कार्यशाळा संपन्न झाली.

शहरातील हॉटेल ट्रीटमध्ये पार पडलेली ही परिषद द इन्फर्टीलिटी रिव्होल्यूशन : ट्रान्सफॉर्मिंग चॅलेंजेस इंटू ट्रायम्फ्स या संकल्पनेवर आधारित होते.

यावेळी अध्यक्षा डॉ. सुनीता तांदूळवाडकर यांनी गर्भपिशवीतल्या गाठीचे ऑपरेशन या विषयावर मार्गदर्शन केले, तर आंतरराष्ट्रीय ख्यातीचे स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ. पी. सी. महापात्रा यांनी ऑनलाईन पद्धतीने सहभाग नोंदवीत परिषदेला मार्गदर्शन केले. या परिषदेला देशातील सुमारे ४०० अधिक स्त्रीरोगतज्ज्ञ सहभागी झाले. परिषदेच्या यशासाठी फॉगसी उपाध्यक्ष डॉ. वर्षा बस्ते आणि नाशिक स्त्रीरोग तज्ज्ञ संघटनेच्या अध्यक्षा डॉ. वासंती (नेहा) लाड यांच्या अध्यक्षतेखाली व नाशिक ऑब्स्टेट्रिक्स ॲण्ड गायनॅकोलॉजिकल ट्रस्टचे चेअरमन डॉ. रमेश देसले, डॉ. वसंत कवडे यांनी सहकार्य केले. डॉ. गौरी पिंपराळेकर आणि डॉ. कविता गाडेकर यांनी या परिषदेच्या सचिव व डॉ. व्ही. बी. शेख कोषाध्यक्षपदाची जबाबदारी सांभाळली.

**एकोणिसावे पुण्यस्मरण**



**स्व. दत्तात्रय विष्णु अष्टपुत्रे**
भगवंतराव मिठाईचे संचालक यांना एकोणिसाव्या पुण्यस्मरणानिमित्त विनम्र अभिवादन
:: शोकाकुल ::
**सुहास अष्टपुत्रे व परिवार व माधुरी कुलकर्णी परिवार**
कर्मचारी वृंद
भगवंतराव मिठाई, नाशिक

# संपादकीय

## 'इंडिगो'चा घोळ

'इंडिगो' ही आज देशातील अग्रगण्य विमान कंपनी आहे. देशाच्या विमान वाहतूक क्षेत्राचा ६५ टक्के वाटा या कंपनीकडे आहे. टाटांकडे २७ टक्के वाटा आहे. उरलेल्या टक्क्यात अन्य तीन-चार कंपन्या आहेत. 'इंडिगो'ने आपल्या व्यवहार कुशलतेने हवाई वाहतूक क्षेत्रावर मक्तेदारी मिळवली हे ठीक; पण एवढे महत्त्वाचं स्थान मिळाल्यावर त्याबरोबर काही कर्तव्य आणि जबाबदाऱ्याही येतात याची जाणीव त्या कंपनीला नाही. जेव्हा देशाच्या एखाद्या क्षेत्राच्या ६५ टक्के वाट्यावर आपण अधिराज्य गाजवतो, तेव्हा एका अर्थाने देशातल्या त्या क्षेत्राची सर्वाधिक जबाबदारी आपल्या खांद्यावर आलेली असते; कर्तव्यात चुकलो, तर त्या देशाची प्रतिमा खराब होतेच. पण, ज्यांनी आपल्याला मुक्त संधी आणि प्रोत्साहन दिले, त्यांनाही आपण जनतेसमोर उघडे पाडतो याचा विसर 'इंडिगो'च्या व्यवस्थापनाला पडलेला दिसतो. दहा दिवस झाले, तरी देशात हवाई प्रवास क्षेत्रात झालेला घोळ संपायची चिन्हे दिसत नाहीत. 'आता निदान पंधरा दिवसांत तरी हा घोळ निस्तरा' असे काकुळतीने सांगण्याची वेळ केंद्र सरकारवरच आली आहे! अनेक क्षेत्रे सरकारने खासगी उद्योगांना मुक्त करून दिली असून त्यांचे व्यवहार हे आता पूर्णपणे 'बाजारा'वर; म्हणजेच स्पर्धेवर सोडून दिले आहेत. खासगी उद्योगांचं सेवा व्यवस्थापन, वित्त व्यवस्थापन, कर्मचाऱ्यांबाबतचं धोरण यात सरकार फार हस्तक्षेप करू शकत नाही. त्यामुळेच 'इंडिगो'ने लाखो प्रवाशांचे जगणे वेठीला धरूनही सरकार त्यांच्यावर अद्याप काही कारवाई करू शकलेले नाही. वाहतूक क्षेत्राची नियामक संस्था म्हणून देशात 'नागरी विमान वाहतूक महासंचालनालय' आहे; पण हे महासंचालनालयच बेसावध राहिल्याने हा अभूतपूर्व गोंधळ निर्माण झाला असून आता कारवाई करायची तर आधी कोणावर करावी, असा प्रश्न सरकारला पडला आहे. 'इंडिगो'ने बेजबाबदारपणा केला आहेच; पण विमान वाहतूक क्षेत्रातल्या कंपन्या आपल्या जबाबदाऱ्या नीट पार पाडताहेत की नाही, याची खातरजमा करण्यासाठी जी नियामक यंत्रणा आहे, तिनेच डोळेझाक केली असल्याने सरकारची पंचाईत झाली आहे. झालेला घोळ लवकर निस्तरला नाही व त्यातून राष्ट्रीय संपत्तीचे नुकसान झाले, या आरोपाखाली पंधरा दिवसांनंतर सरकारला कदाचित कारवाई करता येईल! कोणतेही वाहन संकेत व नियम न पाळता चालविणे धोक्याचेच असते. विमान विशेष धोक्याचे. कारण, ते अधांतरी ३०-३५ हजार फुटांवरून उडत असते. अगदी शे-दोनशे फुटांवर त्यात काही अडचण, संकट आले, तरी मदत करता येणे अशक्य असते. त्यामुळे, विमानाची देखभाल नेहमीच खूप काटेकोरपणे केली जाते. वैमानिकाचे प्रशिक्षण खूप खडतर असते. त्यांना नियमांचे, मार्गदर्शक सूचनांचे खूप काळजीपूर्वक पालन करावे लागते. आपली बौद्धिक, मानसिक व शारीरिक तंदुरुस्ती सतत सिद्ध करावी लागते. सरकारने कान पकडेपर्यंत कंपनी पूर्ण बेफिकीर होती. आता ते कितीही आश्वासने देत असले, तरीही त्या मुदतीत त्यांना परिस्थिती नियंत्रणात आणणे शक्य नाही. वैमानिकांची भरती ही इतकी सहज प्रक्रिया नसते. सरकारने माघार घेतलीच आहे. यावरून धडा घेऊन सरकारनेच आता आपल्या एकूण हवाई प्रवासी धोरणाचा पुनर्विचार करण्याची गरज आहे.

# तुमची रास-आमचा नेम

## दि. १३ ते १९ डिसेंबर २०२५

*** शुभमुहूर्त ***

साखरपुडा - १३, १४, १५, १६ डिसेंबर. बारसे - १३, १६ डिसेंबर. जावळ - १५ डिसेंबर. गृहप्रवेश - १५ डिसेंबर २०२५.

**मेष** — बरीच कामे घडून येतील. उशीर लागणाऱ्या गोष्टींचा ताण कमी होईल. मनावरचा संयम सोडू नका. या कालावधीत वेळेवर एखादे काम झाले नाही म्हणून राग राग करणे टाळा. शांतपणाने घेतले, तर त्रास होणार नाही. नोकरदार वर्गाला महत्त्वाची जबाबदारी स्वीकारताना फार कष्ट करावे लागणार नाहीत. वरिष्ठांचा पाठिंबा मिळेल. व्यावसायिकदृष्ट्या उलाढाल मनासारखी वाढलेली असेल. गुंतवणुकीचा फायदा होईल. आर्थिकदृष्ट्या अनपेक्षित असे फळ मिळेल. शुभ तारीख १५, १६.

---

**वृषभ** — उत्साह वाटेल अशा गोष्टींमध्ये रममाण व्हाल. विलंब लागणाऱ्या गोष्टी आता लवकरात लवकर होऊ लागतील. आजचे काम उद्यावर ढकलण्याची वेळ येणार नाही, अशी स्थिती निर्माण झाल्यामुळे कोणत्याही गोष्टी अडणार नाहीत. नोकरदार वर्गाला कामकाजाव्यतिरिक्त मिळणारा वेळ नवीन कामासाठी देता येईल. व्यावसायिकदृष्ट्या हातचे सोडून पळत्याच्या मागे लागण्याची गरज भासणार नाही. स्वत:च्या कर्तृत्वावर बऱ्याच गोष्टी साध्य कराल. नफा मिळेल. शुभ तारीख १२, १४.

---

**मिथुन** — सुखदायक गोष्टींमध्ये वाढ होईल. प्रत्येक वेळी मन मारून मर्यादित गोष्टी कराव्या लागत होत्या, त्या आता कराव्या लागणार नाहीत. प्रश्नांची मालिका कमी झाल्याने आगामी काळाचे नियोजन करता येईल. नोकरदार वर्गाला कामातील बदल होण्यासाठी वाट बघावी लागणार नाही. व्यावसायिकदृष्ट्या भागीदारी व्यवसायासाठी प्रस्ताव येतील. हे प्रस्ताव स्वीकारायला हरकत नाही. उद्योग-व्यवसायात मोठी झेप घेता येईल. आर्थिक बाबतीत दुहेरी लाभ होईल. शुभ तारीख १५, १६.

---

**कर्क** — शेजारधर्माशी जवळीकता वाढवून त्रास करून घेऊ नका. इतरांवर अवलंबून कोणतीही गोष्ट साध्य होत नाही, याचा अनुभव विसरू नका. जे काही करायचे असेल, ते स्वत:च्या निर्णयावर करा. त्यात यश मिळेल. तुम्ही घेतलेले निर्णय योग्य असतील. नोकरदार वर्गाला केलेल्या कामकाजाचा आराखडा वरिष्ठांकडे मांडताना योग्य शब्दात व्यक्त व्हाल. गुंतवणुकीत वाढ होईल; पण ती फायद्याची असेल. मोठ्या व्यावसायिकांना अनेक योजनांतून लाभ होईल. शुभ तारीख १७, १८.

---

**सिंह** — भावनेच्या आहारी न जाता व्यावहारिकदृष्ट्या विचार करा. मोजक्या गोष्टींना प्राधान्य दिलेले चांगले. कोर्टकचेरी यापासून एक पाऊल मागे या. नोकरदार वर्गाला कामकाजामध्ये गती येईल. व्यवसायात चाललेल्या घडामोडी बदलत्या राहतील. गुंतवणूक वाढविण्याच्या दृष्टीने तुम्ही हाती घेतलेले कार्य सफल होईल. आवक पाहून जावक ठरवा. सामाजिक बांधिलकी चांगल्या प्रकारे जपाल. कुटुंबातील जबाबदारी पार पाडाल. व्याधींकडे दुर्लक्ष करू नका. शुभ तारीख १५, १६.

---

**कन्या** — एखाद्या गोष्टीचा पाठपुरावा करणे तुम्हाला चांगले जमते. स्वत:च्या कर्तृत्वाने बऱ्याच गोष्टी साध्य करून दाखवाल. अफवांवर विश्वास ठेवू नका. इतरांच्या सांगण्यावरून पटकन कृती करणे, त्यामुळे गैरसमजाचे वादळ पसरू शकते, हे लक्षात ठेवा. चालू आठवडा आपल्याला खूप सहनशीलतेने वागावे लागेल. नोकरदार वर्गाची कामात पळापळ होऊ नये, त्यासाठी दुसऱ्यांवर अवलंबून राहू नका. पूर्ण तयारीने कामाचे स्वरूप ठरवा. रोखठोक व्यवहाराला महत्त्व द्या. शुभ तारीख १३, १४.

---

**तूळ** — इतरांना मदत करा. नोकरदार वर्गाला गतीने कामाचा आढावा घ्यावा लागेल. कामात शिथिलता ठेवून चालणार नाही. मोठ्या उद्योगधंद्यांचे चलनवलन चांगल्या स्वरूपात चालू होईल. औद्योगीकरण करणे सोयीस्कर असेल. छोट्या व्यावसायिकांच्या अडचणी दूर होतील. व्यवसायात आजच्यापुरता विचार करू नका. आगामी काळासाठी काही नियोजन करून ठेवा. सार्वजनिक क्षेत्रात सध्या मन लागणार नाही. नातेवाईकांना तुमच्या मदतीची अपेक्षा असेल. शुभ तारीख १५, १६.

---

**वृश्चिक** — ज्या गोष्टीविषयी नकारात्मकता वाटत होती, ती आता दूर होईल. काही चांगले प्रस्ताव तुमच्या समोर येतील. अपेक्षित फळ मिळेल. नोकरदार वर्गाला वरिष्ठांविषयी वाटणारे दडपण कमी होईल. व्यावसायिकदृष्ट्या प्रत्येक गोष्टीची काळजी घेऊनही, पाहिजे तसा प्रतिसाद मिळत नव्हता. सध्या या परिस्थितीत बदल झालेला असेल. त्यामुळे आर्थिकदृष्ट्या मागील दिवसांची पोकळी भरून निघेल. राजकीय क्षेत्रात नव्या कारकीर्दीचा उगम होईल. शुभ तारीख १७, १८.

---

**धनू** — आळस झटकून कामाला लागा. बोलण्याचे ताळतंत्र बिघडवू नका. मोजक्या बोलण्यावर भर द्या. अनावश्यक गोष्टी उकरून काढू नका. मिळालेल्या वेळेचा सदुपयोग करा. कामकाजाचा सूर लागणारा असेल. नोकरदार वर्गाला अधिकार प्राप्त होईल. तुमच्यावर सोपविलेली जबाबदारी नि:संकोचपणे पार पाडाल. व्यावसायिकदृष्ट्या समतोलता राखणे उत्तम जमेल. व्यवसायातील ताण कमी होईल. नियोजित गोष्टी घडत राहतील. उत्पन्न चांगले असेल. शुभ तारीख १५, १६.

---

**मकर** — विविध स्तरांवरून निर्माण झालेले प्रश्न सोडविताना धीर धरा; मात्र मर्यादा लक्षात घ्या. बोलणे स्पष्ट असले, तरी मागील गोष्टी उगाळू नका. अहंकाराला थारा देणे टाळा. विरोधकांपासून दोन हात लांब राहिलेले चांगले. चांगल्या गोष्टींचा प्रयत्न सोडू नका. नोकरदार वर्गाने समोर आलेला पर्याय स्वीकारणे हेच हिताचे राहील. बेकायदेशीररीत्या गोष्टींना साथ देणे टाळा. व्यवसायात चढउतार राहील. भागीदारी व्यवसायात समजुतीने संवाद साधा. शुभ तारीख १३, १४.

---

**कुंभ** — एका दगडात दोन पक्षी मारण्याचा प्रयत्न करू नका. सध्याची परिस्थिती आवाक्यातली नसली, तरी धीर धरून कोणतीही गोष्ट करा. तरच त्याचा त्रास होणार नाही. नियमांच्या चौकटीत राहा. इतरांनी सल्ला देण्याचा प्रयत्न केला तरी ऐकून घ्या. त्यावर तुमचे मत सांगू नका. नोकरदार वर्गाला जास्त कामाचा भार उचलावा लागेल. वरिष्ठांचे दोन शब्द ऐकून घ्यावे लागतील. व्यवसायात नवीन भानगडी करण्याचा प्रयत्न करू नका. आरोग्याकडे लक्ष द्या. शुभ तारीख १५, १६.

---

**मीन** — नवीन काही गोष्टी करावयाच्या असल्यास या आठवड्यात करू नका. इतरांच्या वैयक्तिक गोष्टीत हस्तक्षेप करणे टाळा. आपण भले व आपले काम भले, हेच ध्येय ठेवा. अंगलट येणाऱ्या गोष्टींपासून लांब राहिलेले चांगले, हे लक्षात ठेवा. स्पर्धात्मक गोष्टींच्या मागे लागू नका. नोकरदार वर्गाला कामाच्या बाबतीत मिळतेजुळते घ्यावे लागेल. व्यवसायाच्या माध्यमातून अनेक व्यक्तींशी संपर्क वाढेल; मात्र अनोळख्या व्यक्तींवर अवलंबून राहू नका. शुभ तारीख १७, १८.

# सुकाकाथ मसाला

## घट्ट मैत्री

स्त्रियांच्या मैत्रीपेक्षा पुरुषांची मैत्री अधिक घट्ट असते. कसे ?

असे कसे विचारता ? कसे ते पाहा. एकदा एक बायको संपूर्ण रात्रभर घरीच येत नाही. दुसऱ्या दिवशी नवरा विचारतो तेव्हा ती सांगते, ''अरे, मी एका मैत्रिणीच्या घरी राहिले होते.''

नवऱ्याचा तिच्या शब्दांवर विश्वास बसत नाही. तो तिच्या सर्वात जवळच्या २० मैत्रिणींना फोन करतो. ''ती काल आपल्याकडे आली नव्हती,'' असेच २० ही जणी सांगतात.

आता जेव्हा नवरा संपूर्ण रात्रभर घरीच येत नाही तेव्हा काय होते पाहा. दुसऱ्या दिवशी सकाळी बायको विचारते. तेव्हा तो सांगतो, ''अगं मी माझ्या एका मित्राच्या घरी राहिलो होतो.''

बायकोचा नवऱ्यावर विश्वास बसत नाही. ती त्याच्या सर्वांत जवळच्या २० मित्रांना फोन करते. त्यांतले १० जण छातीठोकपणे सांगतात की काल रात्री तो त्याच्याच घरी होता... आणि उरलेले १० जण तर तो आताही आपल्या घरातच आहे असेही सांगून टाकतात.

– पानवाला

# खाण्यासाठी चेंज हवा?

## कुळीथ पिठले

**साहित्य :-** अर्धी वाटी कुळीथ पीठ, ८-१० कढीलिंबाची पाने ३-४ हिरव्या मिरच्या, अर्धा चमचा मीठ, कोथिंबीर २ आमसुले, २ पळ्या तेल व फोडणीचे साहित्य.

**कृती :-** तेलात मोहरी, जिरे, हिंग, हळद, मिरच्यांचे तुकडे व कढीलिंबाची पाने घालून फोडणी करावी. त्यात तीन भांडी पाणी घालावे. ते थोडेसे उकळायला लागल्यावर त्यात मीठ व आमसुले घालावीत. कुळथाचे पीठ पाण्यात कालवून घालावे व ढवळत राहावे. उकळी आली की खाली उतरवून त्यात कोथिंबीर घालावी व जेवताना भातावर गरम गरम द्यावे.

**– ऐश्वर्या राजेंद्र काळे**

# पाच लाखांचे लोन मंजूर करून देण्याच्या बहाण्याने ७१ हजार रुपयांची फसवणूक

**नवीन नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :-** पाच लाखांचे लोन करून देतो, असे सांगून सिन्नरच्या तरुणाला आयफोन घेण्यास भाग पाडून ७१ हजार रुपयांची फसवणूक करणाऱ्या तरुणीसह चार जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, की आरोपी ऋतिका दाभाडे, सचिन खिल्लारी, गणेश जगदाळे व ओम्कार शिंगरे यांनी संगनमत करून फिर्यादी ऋषिकेश भगवान क्षत्रिय (रा. कुंभार गल्ली, मु. पो. ता. सिन्नर) यांना पाच लाखांचे लोन करून देतो, असे सांगितले.

त्यानंतर चौघा आरोपींनी फिर्यादी क्षत्रिय यांना ७१ हजार रुपये किमतीचा आयफोन खरेदी करण्यास भाग पाडले.

हा आयफोन क्षत्रिय यांनी खरेदी केल्यानंतर तो पुन्हा आरोपी सचिन खिल्लारी याने तो ६१ हजार रुपये किमतीमध्ये खरेदी करण्याचा बहाणा केला.

त्यानुसार फिर्यादीने खिल्लारीकडे मोबाईल दिला; मात्र या चौघा आरोपींनी फिर्यादीचा मोबाईल घेऊन त्याला पैसे व मोबाईल परत न देता ७१ हजार रुपयांचा अपहार करून त्यांची फसवणूक केली. हा प्रकार २६ एप्रिल २०२५ रोजी पाथर्डी फाटा येथील रिलायन्स मॉल येथे घडला होता.

या प्रकरणी इंदिरानगर पोलीस ठाण्यात ऋतिका दाभाडे, सचिन खिल्लारी, गणेश जगदाळे व ओम्कार शिंगरे यांच्याविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक गांगुर्डे करीत आहेत.

# भ्रमर शब्दकोडे क्र. ३६३

**उभे शब्द :** १) पोहणे २) हत उलट लिहा ३) ठाणे लगतचा नवीन जिल्हा ४)स्व. गानसम्राज्ञी-** मंगेशकर ५) पंधरा दिवसांचा कालावधी ६) सोने, सुवर्ण ७) सतत कार्यरत असणारा अगदी छोटा जीव ११) महिना १३) ताकदवान १४) कसलाही विचार न करता तातडीने घेतलेला निर्णय १६) राक्षस १९) पटकन, लगेच २०) सोनिया गांधी यांचे पुत्र २१) फ्ल्यू (मराठीत) २३) एक मराठी अभिनेता २७) मागील वेळी, दशा, अवस्था २८) उत्सवाचा दिवस ३०) सायकलचे लोखंडी चाक ३१) आपला देश ३३) मग्न, तर उलट लिहा ३५) दाक्षिणात्य अभिनेता-*** हसन ३८) दहा गुणिले दहा ४१) कोकणातील कृषी विद्यापीठ ४२) अभिनेता, बोल्टचा जोडीदार ४३) जुनाच्या विरूध्दार्थी ४४) फटाक्यांची माळ ४६) गाणे

**आडवे शब्द :** १) मूळचे सांगली जिल्ह्यातील असलेले राष्ट्रवादीचे (शरद पवार गट) एक माजी मंत्री ५) बीडच्या नेत्या ८) नांगर (हिंदीत) ९) पैसा, संपत्ती १०) पर्वा, चिंता १२) घड्याळ (हिंदीत) १३) उन्नती, भरभराट १५) रसभरीत, रसाने भरलेला १७) त्वचेवरील बारीक केस १८) दुप्पट (इंग्रजीत) २०) राजाचे मोठे घर २१) एखादा पदार्थ मनसोक्त खाणे-** मारणे २२) पाण्याचे बाष्परूप २३) धान्य पाखडण्याचे साधन २४) तुरूंग (इंग्रजीत) २५) बैलाच्या मानेवरील जोखड २६) टेकडी (हिंदीत) २९) दुर्योधनाची आई ३१) वर्तविलेले भविष्य ३२) नदीवरील बंधारा ३४) एक रास ३६) इंग्रजी मुळाक्षरातील पहिले अक्षर ३७) शिजविलेला तांदूळ ३९) दोन (हिंदीत) ४०) निवडणुकीमध्ये उमेदवाराला मत देणे ४३) आकाश, गगन ४४) मनातील खंत, शल्य ४५) वेगळे झाल्यानंतर पतीने पत्नीला द्यावयाची रक्कम ४७) वडिलोपार्जित संपत्तीचा वारसाहक्काने मालक ४८) रामायणातील सुग्रीवाचा भाऊ

**शब्दकोडे क्र. ३६२ चे उत्तर**

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| न | य | न | ता | रा | स | ह | ग | ल | | अ | ति |
| वा | | वा | स | | फ | ल | | व | | रू | ळ |
| जु | लै | | गा | ज | र | | | क | रू | णा | |
| द्वि | | सा | व | न | | दि | वा | र | | ढे | प |
| न | | य | | ता | न | से | न | | पा | रे | ख |
| सि | ता | रा | | द | र | | र | हा | ट | | वा |
| द्वि | | बा | द | ल | | द | | त | | आ | ज |
| की | | नू | र | | म | हा | ग | | सा | ठ | |
| | शो | | वे | त | न | | हू | | स | व | त |
| म | ध | मा | शी | | क | ल | | व | र | ण | |
| हे | | ध | | त | व | की | र | | वा | | चा |
| श | नि | वा | र | वा | डा | | जा | | स | त्त | र |

# एकात्मिक मोबाईल ॲपसाठी सूक्ष्म नियोजन करावे : डॉ. प्रवीण गेडाम



**नाशिक (जिमाका वृत्तसेवा) :-** आगामी सिंहस्थात येणारे भाविक, साधू, संत, महंत, पर्यटक व प्रशासकीय यंत्रणा यांना वापरासाठी एकात्मिक मोबाईल ॲप व वेब पोर्टल तयार करण्यात येत आहे. यात आवश्यक सर्व सेवा सुविधा अंतर्भूत करून ॲपला अंतिम स्वरूप देण्यासाठी यंत्रणांनी सूक्ष्म नियोजन करावे, अशा सूचना विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम यांनी दिल्या.

जिल्हाधिकारी कार्यालयातील मध्यवर्ती सभागृहात आयोजित ब्रेनस्टॉर्मिंग सत्रात ते बोलत होते. यावेळी कुंभमेळा प्राधिकरण आयुक्त शेखर सिंह, महानगरपालिका आयुक्त मनीषा खत्री, जिल्हाधिकारी आयुष प्रसाद, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी ओमकार पवार, महानगरपालिकेच्या अतिरिक्त आयुक्त करिष्मा नायर, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. चारुदत्त शिंदे, पर्यटन संचालनालयाचे उपसंचालक नंदकुमार राऊत, पोलीस उपायुक्त किरणकुमार चव्हाण, त्रिंबक नगर परिषदेचे मुख्याधिकारी राहुल पाटील, विभागीय वाहतूक अधिकारी किरण भोसले यांच्यासह विविध विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

विभागीय आयुक्त प्रवीण गेडाम म्हणाले, की कुंभमेळा काळात जगभरातील भाविक व पर्यटक नाशिक व त्र्यंबकेश्वर येथे येणार आहेत. त्यामुळे एकात्मिक स्वरूपाचे ॲप तयार करताना ते वापरकर्त्यांना वापरावयास सुलभ असावे. या ॲपमध्ये पार्किंगची ठिकाणे, भाविकांची गर्दीची घनता, हेल्पलाईन क्रमांक, रिअल टाईम सीसीटीव्ही, हॉस्पिटलची माहिती, बस व रेल्वेची वेळापत्रके, उपाहारगृहांची माहिती, आरोग्य यंत्रणा, मूलभूत सोयीसुविधांची उपलब्धता यासारख्या अत्यावश्यक सेवांची माहिती अंतर्भूत असावी. पोलीस विभाग, महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ, मेक माय ट्रीप या ॲपच्या सुविधा भाविकांना प्राप्त होण्यासाठी तयार करण्यात येणाऱ्या वेब पोर्टलला एपीआयच्या माध्यमातून सुविधा देण्यात यावी, तसेच कुंभमेळा काळातील विशेष गरजा जसे एसओएस बटण, जीपीएस ट्रॅकिंग या सुविधांसह हे ॲप बहुभाषिक असावे. सर्वसमावेशक चर्चेतून यास अंतिम स्वरूप दिले जाईल, असेही त्यांनी सांगितले. यावेळी ॲप तयार करणाऱ्या संस्थांनी प्रायोगिक तत्त्वावर तयार केलेल्या प्रणालीचे सादरीकरणातून सिंहस्थ काळात ॲपद्वारे देण्यात येणाऱ्या सुविधांची माहिती दिली, तर अधिकाऱ्यांनी काही मार्गदर्शक सूचनाही केल्या.

# मनमाड नगर परिषद रणसंग्राम; महिला मतदारांची निर्णायक आघाडी

**मनमाड (भ्रमर वार्ताहर) :-** नाशिक जिल्ह्यातील लोकसंख्येच्या दृष्टीने तिसऱ्या क्रमांकाचे शहर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मनमाडच्या परिषदेमध्ये मतदानाचा लोकशाही सोहळा उत्साहात आणि शांततेत पार पडला. मनमाडमध्ये ६३.६१ टक्के मतदान नोंदविले गेले असून, मागील निवडणुकीच्या तुलनेत पाच टक्क्यांची घट दिसली.

तथापि, आजी-माजी आमदारांची प्रतिष्ठा या निवडणुकीत पणाला लागल्यामुळे दि. २१ डिसेंबर रोजी होणाऱ्या मतमोजणीचा निकाल राजकीय चित्र पालटणारा ठरू शकतो, अशी चिन्हे दिसू लागली आहेत.

मतदान प्रक्रिया पार पडताच सर्व ईव्हीएम मशीन शहरातील महात्मा बसवेश्वर चौकातील नगर परिषदेच्या कार्यालयात स्ट्राँग रूममध्ये कडक सुरक्षाव्यवस्थेत जमा करण्यात आल्या आहेत. यासाठी २४ तास सशस्त्र पोलिसांचा त्रिस्तरीय बंदोबस्त लावण्यात आला आहे. हा संपूर्ण परिसर सीसीटीव्ही कॅमेऱ्यांच्या नजरेखाली ठेवण्यात आला असून, अनधिकृत प्रवेशांवर संपूर्ण बंदी घालण्यात आली आहे. उमेदवारांनी मतदानानंतर कार्यकर्त्यांशी संवाद साधण्यासाठी हॉटेल-ढाब्यांवर बैठका घेतल्या.

काही गटांनी मतदानाचे छोटे-मोठे सेलिब्रेशनही केले जात असल्याची चर्चा होत आहे. मतदानाचे प्राथमिक आकडे उपलब्ध होताच महायुती, शिवसेना ठाकरे गट, राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट आणि अपक्ष नेत्यांनी गुप्त बैठका घेणे सुरू केले आहेत. निरीक्षकांनी सादर केलेल्या अहवालाच्या आधारे प्रभागनिहाय मतदानाचे विश्लेषण करण्यात येत आहे.

मतदानात कुठे वाढ? कोणत्या वॉर्डात घट? कोणत्या गटाला कसा लाभ? याचा सविस्तर अभ्यास करून नगराध्यक्ष व नगरसेवकपदांची संभाव्य समीकरणे जुळविण्याचे प्रयत्न पक्षस्तरावर सुरू आहेत. मतदानात झालेली घट कोणाचे पारडे जड करणार, ही बाब निकाल लागेपर्यंत गूढ राहणार आहे.

या निवडणुकीचा सर्वांत ठळक व सकारात्मक पैलू म्हणजे महिला मतदारांनी पुन्हा विक्रमी मतदान करून पुरुषांना मागे टाकले आहे. महिलांच्या या वाढीव सहभागामुळे राजकीय समीकरणांत मोठा फरक पडण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# पंचवटीत सव्वा लाखाची घरफोडी

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :-** घराच्या दरवाजाचा कडीकोयंडा व लॅचलॉक तोडून अज्ञात चोरट्याने सोन्याचांदीचे दागिने व रोकड असा सव्वा लाखाचा ऐवज घरफोडी करून चोरून नेल्याची घटना पंचवटीत घडली.

फिर्यादी धीरजसिंग डोंगरसिंग राजपूत (रा. साई एम्पायर, कैलासनगर, आडगाव शिवार) यांच्या पत्नी मुलांना शाळेतून आणण्यासाठी गेल्या होत्या. त्यावेळी अज्ञात चोरट्याने राजपूत यांच्या घराच्या दरवाजाचा कडीकोयंडा व लॅचलॉक तोडून घरात प्रवेश केला.

त्यानंतर घरातील बेडरूममध्ये कपाटाचा दरवाजा उघडून व कपाटाचे लॉकर तोडून त्यात असलेली ५० हजार रुपये किमतीची दोन तोळे वजनाची सोन्याची पोत, २५ हजार रुपये किमतीचे एक तोळा वजनाचे मंगळसूत्र, १७ हजार ५०० रुपये किमतीचे छोटे मंगळसूत्र, १८ हजार रुपये किमतीचे चांदीचे पेंडल, तीन हजार रुपये रोख व देवघरातील पितळी शिवलिंग असा १ लाख १३ हजार ८०० रुपये किमतीचा ऐवज अज्ञात चोरट्याने घरफोडी करून चोरून नेला.

या प्रकरणी आडगाव पोलीस ठाण्यात घरफोडीचा गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास पोलीस हवालदार बहिरम करीत आहेत.

# लोकअदालतीमध्ये आठ हजार वीजग्राहकांना तडजोडीची संधी

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :-** राष्ट्रीय लोक अदालतीअंतर्गत नाशिक जिल्हा विधी सेवा प्राधिकरणामार्फत जिल्हा व सर्व तालुका स्तरावर शनिवार (दि.१३ डिसेंबर) रोजी जिल्हा व तालुका न्यायालयात राष्ट्रीय लोकअदालत आयोजित करण्यात आली आहे. यात महावितरणची कायमस्वरूपी वीजपुरवठा खंडित असलेले आणि वीजचोरीशी संबंधित दाखलपूर्व प्रकरणे आणि न्यायालयात प्रलंबित अशी एकूण ८ हजार १०८ अधिक प्रकरणे तडजोडीसाठी ठेवण्यात आली आहेत. या प्रकरणांचा निपटारा तडजोडीच्या माध्यमातून लोकअदालतीमध्ये करण्यात येणार आहे, तरी संबंधित ग्राहकांनी या संधीचा लाभ घेण्याचे आवाहन महावितरणकडून करण्यात आले आहे.

आज (दि. १३) होणाऱ्या लोकअदालतीत महावितरणकडून कायमस्वरूपी वीजपुरवठा खंडित असलेली व वीजचोरी संबंधित दाखलपूर्व प्रकरणे आणि न्यायालयात प्रलंबित असलेली एकूण ८ हजार १०८ अधिक प्रकरणे तडजोडीसाठी ठेवण्यात आली आहेत.

कायमस्वरूपी वीजपुरवठा खंडित असलेले ग्राहक यामध्ये मालेगाव मंडळाचे १ हजार ७७६, तर नाशिक मंडळाचे ४ हजार ९०६ अशा एकूण ६ हजार ६८२ दाव्यांचा समावेश आहे, तसेच वीजचोरीसंबंधित १ हजार ४२६ दाव्यांचा समावेश आहे.

अशी एकूण ८ हजार १०८ अधिक प्रकरणे तडजोडीसाठी ठेवण्यात येणार आहेत. विधी सेवा प्राधिकरण अधिनियम १९८७ च्या कलम २० (२) प्रमाणे नोटीस पाठविण्यात आल्या असून, तरी ज्या ग्राहकाला नोटीस मिळाली नसली, तरी ते सदर ग्राहक हे जिल्हा वा तालुका न्यायालयात उपस्थित राहून याचा लाभ घेऊ शकतात. नोटीसमध्ये देयकाचा तपशील देण्यात आला असून, पूर्व चर्चेने समेट करण्यासाठी संबंधित वीजग्राहकांना लोकअदालतीमध्ये उपस्थित राहण्याचे नमूद करण्यात आले आहे, तसेच थकित देयकाबाबत माहिती किंवा त्याचा भरणा करण्यासाठी संबंधित विभाग किंवा उपविभाग कार्यालयांशी संपर्क साधावा, या लोकअदालतीमध्ये तडजोड केल्यास थकबाकीदार वीजग्राहकांना पुढील कायदेशीर कारवाई टाळता येणार आहे.

विनाविलंब न्याय मिळविण्याच्या दृष्टिकोनातून, तसेच परस्पर समन्वयासाठी लोकअदालतीचे आयोजन करण्यात आले आहे. भविष्यातील आर्थिक व मानसिक कटकटींपासून सुटका होत असल्याने अधिकाधिक ग्राहकांनी लोकअदालतीचा लाभ घेण्याचे आवाहन महावितरणच्या नाशिक परिमंडळाचे मुख्य अभियंता सुंदर लटपटे यांनी केले आहे.

# धुळे विरुद्ध व्यंकटेश बेहरेचे ५ बळी



**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :-** नाशिक येथे सुरू झालेल्या महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या, राज्यस्तरीय १९ वर्षांखालील वयोगटातील आमंत्रितांच्या साखळी क्रिकेट स्पर्धेच्या (एमसीए इन्व्हिटेशन लीग), दोनदिवसीय कसोटीत धुळे विरुद्ध नाशिकचा कर्णधार व्यंकटेश बेहरेने आपल्या मध्यमगती गोलंदाजीने पहिल्या डावात ५ बळी घेण्याची कामगिरी केली व पहिला दिवस गाजविला. एसएसके मैदानावर सुरू झालेल्या या सामन्यात नाशिकने नाणेफेक जिंकून धुळे संघाला प्रथम फलंदाजी दिली. व्यंकटेश बेहरेने सुरुवातीलाच तीन धक्के दिल्याने धुळे संघाची ३ बाद ३७ अशी स्थिती झाली. वरुण पाटीलच्या ६४ धावांमुळे धुळे संघास सर्वबाद १८२ इतकी मजल मारता आली. व्यंकटेश बेहरेने आणखी २ बळी घेत २० षटकांत ४५ धावा देत आपल्या ५ बळींची नोंद केली. त्यास देवाशिष गायकवाड २, तर सायुज्य चव्हाण व वेद सोनावणे यांनी प्रत्येकी १ बळी घेत साथ दिली. उत्तरादाखल पहिल्या दिवसअखेर नाशिक संघाने १ बाद ५७ धावा केल्या. ध्रुव एखंडे २९ धावा करून बाद झाला, तर चिन्मय भास्कर नाबाद २१ धावांवर खेळत आहे. पहिल्या डावातील आघाडीसाठी नाशिकला आणखी १२५ धावांची गरज आहे.

## कोटक सिक्युरिटीजचा २०२६ करिता बाजाराबाबत दृष्टिकोन

# जागतिक अस्थिरतेतही समभाग बळकट, तर सोन्याची चमक कायम राहणार




**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :-** कोटक सिक्युरिटीज लिमिटेड (कोटक निओ) ने २०२६ मधील शेअरबाजाराच्या वाटचालीबाबतचा 'मार्केट आऊटलुक २०२६' हा अहवाल आज प्रसिद्ध केला. जागतिक पातळीवर अनिश्चितता राहणार असली, तरी भारतीय शेअरबाजार व कमोडिटी क्षेत्र चांगली कामगिरी करण्याचा आशावाद या अहवालात व्यक्त करण्यात आलेला आहे. आगामी वर्षांत गुंतवणूकदारांनी बारकाईने लक्ष ठेवावे, असे ढोबळ आर्थिक पातळीवरील प्रमुख प्रवाह (मॅक्रो ट्रेंड), क्षेत्रनिहाय निर्माण होऊ शकणाऱ्या संधी व कमोडिटी क्षेत्रातील प्रवाह याबाबत या अहवालात प्रकाशझोत टाकण्यात आलेला आहे.

अहवालाच्या अनावरणाप्रसंगी बोलताना कोटक सिक्युरिटीजचे एमडी व सीईओ श्रीपाल शाह म्हणाले, की जागतिक अस्थिरतेतही भारत विकासाचा लखलखणारा दिवा राहणार आहे. कंपन्यांचे उत्पन्न भरभक्कम राहण्याचा अंदाज व सरकारच्या धोरणात्मक पाठबळ या दोन घटकांमुळे समभागांबाबत आमचा दृष्टिकोन अतिशय सकारात्मक आणि उत्साहवर्धक आहे. सन २०२६ मध्ये सोने गुंतवणुकीसाठी सुरक्षित मालमत्ता म्हणून आपली चमक कायम राखण्याची अपेक्षा आहे. तरुण गुंतवणूकदारांच्या वाढत्या सहभागामुळे शेअरबाजार अधिकाधिक विस्तारेल आणि संपत्तीनिर्मितीसाठी तो सज्ज आहे. गुंतवणूक उद्योगाच्या बाबतीत भाष्य करताना ते पुढे म्हणाले, ''सेबीने नुकतेच केलेल्या सर्वेक्षणाच्या निष्कर्षांनुसार ६३ टक्के कुटुंबांना शेअरबाजारातील किमान एका तरी गुंतवणूक योजनेबाबत माहिती आहे. परंतु केवळ ९.५ टक्के कुटुंबे शेअर बाजारात गुंतवणुकीबाबत सक्रिय आहेत. यातून भारताच्या शेअर बाजारात वाढीची प्रचंड क्षमता दडली असल्याचे स्पष्ट होते. गुंतवणूक अधिकाधिक सर्वसमावेशक व सुलभ करण्यासाठी ब्रोकरेज कंपन्यांनी पुढाकार घेणे अतिशय आवश्यक आहे.'' कोटक सिक्युरिटीज मार्केट आऊटलुक २०२६ अहवालात पुढील वर्षासाठी नमूद करण्यात आलेले प्रमुख प्रवाह आणि त्यांच्या परिणामांची रूपरेषा पुढीलप्रमाणे आहे.

सप्टेंबर २०२४ मध्ये भारतीय शेअरबाजाराने उच्चांकी पातळी गाठल्यानंतर १७ टक्क्यांची घट झाली होती, परंतु २०२५ च्या अखेरीस निफ्टी फिफ्टीने पुन्हा नवीन सर्वकालीन उच्चांकाला स्पर्श केला. या काळात लार्ज-कॅप्समध्ये वाढ दिसून आली, तर मिड-कॅप्स आणि स्मॉल-कॅप्समध्ये घसरण झाली; ऑटोमोबाईल, बँकिंग आणि धातू क्षेत्रांनी उत्कृष्ट कामगिरी केली, तर आयटी व एफएमसीजी क्षेत्र कमकुवत राहिले. विदेशी गुंतवणूकदारांनी सातत्याने पैसे काढून घेतले असतानाही स्थानिक गुंतवणूकदारांच्या गुंतवणुकीमुळे बाजारातील स्थैर्य आणि विश्वास टिकून राहिला, प्राथमिक बाजारातील मजबूत उलाढालीतून गुंतवणूकदारांचा आशावाद अधोरेखित झाला.

निफ्टीच्या कमाईबाबत धारणा अधिक बळकट झाली असून, आर्थिक वर्ष २७ मध्ये १७.६ टक्के व आर्थिक वर्ष २८ मध्ये १४.८ टक्के नफावाढीचा अंदाज आहे. डिसेंबर २०२६ पर्यंत निफ्टी २९,१२० अंशांवर पोहोचू शकतो (आर्थिक वर्ष २८ च्या १,४५६ ईपीएसवर २० पट पी/ई), तेजीच्या परिस्थितीत ३२,०३२ अंशांचे लक्ष्य (२२ पट पी/ई), तर मंदीच्या स्थितीत २६,२०८ अंशांच्या आसपास राहण्याची शक्यता (१८ पट पी/ई) व्यक्त केली आहे. चालू वर्ष २६ साठी पसंतीची क्षेत्रे बीएफएसआय, तंत्रज्ञान, हेल्थकेअर व हॉस्पिटॅलिटी अशी आहेत. कमोडिटीज्‌मध्ये, २०२५ मध्ये सोन्याने प्रचंड अनिश्चितता, भू-राजकीय तणाव व जागतिक मध्यवर्ती बँकांच्या खरेदीमुळे प्रतिऔंस ४,००० डॉलरचा टप्पा ओलांडत ५५ टक्क्यांपेक्षा जास्त वाढ नोंदविली, तर रुपयाच्या घसरणीमुळे भारतात सोन्याच्या किमती ६० टक्के वाढल्या. चांदीनेही सुरक्षित गुंतवणुकीची वाढती मागणी व पुरवठ्यातील कमतरता यामुळे १०० टक्के वाढ नोंदविली. भू-राजकीय तणाव व अधिशेष पुरवठ्यामुळे कच्च्या तेलात १९ टक्के घट झाली असल्याने २०२६ मध्ये सावधगिरी आवश्यक आहे; तांबे व ॲल्युमिनियमसारख्या मूलभूत धातूंचे दर वाढत्या विद्युतीकरणाच्या मागणी व पुरवठ्यातील आव्हानांमुळे स्थिर पण अस्थिरतेसह राहिले.

# मॉडर्न कॉलेजमध्ये गुणगौरव उत्साहात




**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :-** जनता सेवा मंडळ संचलित यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ अभ्यास केंद्र मॉडर्न कॉलेज पंचवटी नाशिक केंद्राचा सन २०२५ या शैक्षणिक वर्षातील विद्यार्थ्यांचा गुणगौरव समारंभ आ. सत्यजित तांबे यांच्या हस्ते पार पडला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गं. पां. माने होते. संचालिका सुनंदा माने, उपाध्यक्ष शैलेश माने, सेवानिवृत्त केंद्रप्रमुख विजय निपाणीकर, प्रसिद्ध बांधकाम उद्योजक सुनील खैरनार, प्रा. ज्ञानेश्वर गायकवाड आदींच्या उपस्थितीत कार्यक्रम पार पडला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राध्यापक डी. एस. यशवंते यांनी केले. प्रतिमापूजन व विद्यापीठ गीत सर्वधर्मसमभाव प्रार्थना आदींनी कार्यक्रमाची सुरुवात झाली.

प्राजक्ता पालवी, निकिता भोंडवे, सरला तांबे, अवधूत आहेर, उमाकांत वाणी, कल्पना गरुड, गीता राऊत, विश्वदीप गायकवाड आदी गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. आ. सत्यजित तांबे यांनी आपल्या मनोगतात शिक्षणाचे महत्त्व विशद केले. 'ज्ञानगंगा घरोघरी' या ब्रीदवाक्याप्रमाणे ज्ञानाची गंगा घरोघरी नेणाऱ्या मुक्त विद्यापीठाचे कार्य सांगितले व शिक्षणाच्या प्रवाहाबाहेर गेलेल्या विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवाहात येण्यासाठी आवाहन केले. यावेळी उद्योजक मित्राची पदवीबाबतची माहिती त्यांनी विद्यार्थ्यांना सांगून पदवीचे महत्त्व स्पष्ट केले. पत्रकार सेवानिवृत्त केंद्रप्रमुख विजय निपाणीकर यांनी विद्यापीठ गीताचे महत्त्व समजावून विद्यापीठाचे कार्य विशद केले व भविष्यातील असलेल्या आव्हानांची माहिती देऊन शिक्षणाशिवाय आव्हानांना तोंड देता येणार नाही, तसेच जनता सेवा मंडळाचे नाशिक जिल्ह्यात असलेले शैक्षणिक क्षेत्रातील योगदान यावेळी विशद केले. विद्यार्थी प्रतिनिधी म्हणून मोहन जगताप, अवधूत आहेर व विश्वदीप गायकवाड यांनी मनोगत व्यक्त करून विद्यापीठ व संस्थेचे आभार मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मुख्याध्यापक प्रशांत पगार, मुख्याध्यापक समाधान निकम, प्रा. डी. एस. यशवंते, संपत पेलमहाले, प्रा. वेदांत खरात, राहुल पाटील, नीलेश अहिरे, भास्कर पवार व रमेश नाडे यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अवधूत आहेर व आभार केंद्र संयोजक कैलास पवार यांनी मानले.

# सोलिसकडून किसान पुणे २०२५ मध्ये प्रगत व सर्वांत शक्तिशाली ट्रॅक्टर्सचे प्रदर्शन




**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :-** सोलिस या इंटरनॅशनल ट्रॅक्टर्स लिमिटेड (आयटीएल)च्या प्रमुख ब्रँडने महाराष्ट्रातील पुणे येथे किसान ॲग्री शो २०२५ मध्ये सर्वांत शक्तिशाली मल्टीस्पीड ट्रॅक्टर्सच्या नावीन्यपूर्ण व व्यापक श्रेणीला दाखविले आहे. यामध्ये नुकतेच लाँच करण्यात आलेल्या सोलिस जेपी ९७५ ट्रॅक्टरचा समावेश आहे, जो पूर्णपणे नेक्स्ट जनरेशन प्लॅटफॉर्मवर डिझाईन करण्यात आला आहे, तसेच सॉलिस २७१६ एसएन आणि यानमार वायएम २३५ अशा नेक्स्ट-जनरेशन मॉडेल्सचा समावेश आहे, जे शेतकऱ्यांना अधिक आऊटपुट देण्यासाठी डिझाईन करण्यात आले आहेत. या नवीन मॉडेल्सना पूरक म्हणून कंपनीच्या श्रेणीमध्ये सोलिस ५७२४ ४ डब्ल्यूडी आणि वायएम ३४८ आरदेखील आहेत, जे विशेषत: प्रत्येक विकसित किसानला सर्वोत्तम आरामदायीपणा आणि उच्च ऑपरेशन कार्यक्षमता देण्यासाठी डिझाईन करण्यात आले आहेत. सोलिस जेपी ९७५ २ डब्ल्यूडी/४ डब्ल्यूडी पूर्णपणे नवीन प्लॅटफॉर्मवर डिझाईन करण्यात आला आहे, ज्यामध्ये जेपी टेक ४-सिलिंडर इंजिन, भारतातील सेगमेंटमधील पहिले १५ एफ + १५आर इपिसायकलिक ट्रान्समिशन, साईड-शिफ्ट गिअर्स आणि सर्वोत्तम कृषी अनुभवासाठी किमान ५ सानुकूल वर्किंग स्पीड्स आहेत. ऑर्चर्ड एक्स्पर्ट सोलिस २७१६ एसएनमध्ये जगातील सर्वोत्तम इंजिन, सर्वोच्च पीटीओ पॉवर, साईड शिफ्ट गिअर, ३ फीट पर्याय, १२ एफ + ४ आर ट्रान्समिशन आहे, तर फार्मिंग एक्स्पर्ट वायएम २३५ मध्ये सानमारचे प्रगत शक्तिशाली इंजिन, प्रोजेक्टर हेड लॅम्प, प्रमाणित आरओपी, पॉवर शटलसह दर्जात्मक ग्राऊंड क्लिअरन्सची खात्री देणारे १६ स्पीड पर्याय, किमान टर्निंग रेडियस, उत्तम नियंत्रण आणि सर्व कृषी क्रियाकलापांसाठी वैविध्यता आहे. किसान पुणे शोमधील कंपनीच्या स्टॉल क्रमांक ओडी-०३ मध्ये कंपनीने यानमार वायएम ३४८आरसह मोठे १४.९ x २८ आकाराचे रिअल टायरदेखील प्रदर्शित केले आहे.

# महापालिका निवडणुका एकत्र लढवणार

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :-** राज्यातील सर्व महापालिका निवडणुका महायुती एकत्र लढविण्याबाबत एकमत झाल्याची विश्वसनीय सूत्रांची माहिती आहे. कल्याण, डोंबिवली, ठाणे व उल्हासनगरमध्ये भाजपा व शिवसेना शिंदे गट एकत्र निवडणूक लढविणार आहेत. नवी मुंबई महापालिकेबाबत मात्र अद्यापही सस्पेन्स कायम आहे.

# स्ट्रॉग रूम भागात जॅमर बसवण्याची सर्वपक्षीय मागणी



**मनमाड (भ्रमर वार्ताहर) :-** मनमाड नगर परिषद निवडणुकीनंतर मतमोजणी लांबणीवर गेल्यामुळे स्ट्राँग रूमच्या सुरक्षेचा मुद्दा चांगलाच तापला आहे. ईव्हीएम मशीन्समध्ये कोणतीही छेडछाड होऊ नये, तसेच परिसर पूर्णपणे सुरक्षित राहावा यासाठी स्ट्रॉग रूम भागात जॅमर बसवण्याची मागणी सर्वपक्षीय उमेदवारांकडून करण्यात आली होती; मात्र प्रशासनाकडून अद्यापही या मागणीवर कोणतीही कार्यवाही न झाल्यामुळे सर्व पक्षीय उमेदवारांनी उद्या ता १२ डिस रोजी प्राणांतिक उपोषणास बसण्याचा इशारा दिला आहे.


मतदान ता. १७ रोजी झाले असून दुसऱ्या दिवशी मतमोजणी अपेक्षित होती; मात्र प्रशासनातील कारणास्तव मतमोजणी ता. २१ रोजी होणार आहे. मतदान झालेली ईव्हीएम मशीन्स सध्या पालिकेच्या सार्वजनिक वाचनालयात ठेवण्यात आलेली आहेत.

या ठिकाणी पोलीस यंत्रणा तैनात असून विविध पक्षांचे उमेदवार रात्रंदिवस जागता पहारा देत आहेत. दिवसा-रात्री उमेदवारांची उपस्थिती कायम असून काही जणांनी या परिसरात सकाळी आंघोळ करण्याची वेळ आल्याची स्थिती निर्माण झाली आहे.

सुरक्षेच्या दृष्टीने स्ट्रॉग रूम परिसरात जॅमर बसवण्याची मागणी निवडणूक प्रशासनाकडे करण्यात आली होती. मात्र प्रशासनाने ती मान्य न केल्याने आज सर्वपक्षीय उमेदवारांनी पालिका प्रशासक, तसेच मुख्याधिकाऱ्यांना निवेदन देऊन तीव्र नाराजी व्यक्त केली.

यासंबंधी देण्यात आलेल्या निवेदनात म्हटले आहे, की स्ट्रॉग रूम परिसरात जॅमर बसवण्यासाठी अर्ज देऊनही त्यावर कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही. त्यामुळे आम्ही सर्वपक्षीय उमेदवार उद्या ता. १२ रोजी मनमाड नगर परिषद येथे सकाळी १० वाजल्यापासून प्राणांतिक उपोषणास बसणार आहोत. यानंतर उद्भवणाऱ्या सर्व परिणामांसाठी स्थानिक प्रशासन व निवडणूक अधिकारी जबाबदार असतील.

या निवेदनावर राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे नगराध्यक्ष पदाचे उमेदवार रवींद्र घोडेस्वार, उमेदवार संतोष अहिरे, शिवसेना ठाकरे गटाचे जिल्हाप्रमुख व नगराध्यक्ष पदाचे उमेदवार प्रवीण नाईक, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे उमेदवार शुभम चुनियान, तसेच नारायण पवार, प्राची सुरवसे, सोनाली घोडेस्वार, प्रमोद पाचोरकर, अनिल दराडे, गुरू निकाळे, राजेंद्र भाबड, मनोज अंकुश, विजय मिश्रा, पुष्पा करकाळे, अमोल गांगुर्डे, सुचिता अहिरे आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.



# हिरावाडीत उद्या प्रमोद केणे यांचे प्रवचन

**नवीन नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :-** सद्‌गुरू श्री शंकर महाराज देवस्थान केशवनगर, अहमदनगर, हिरावाडी येथे उद्या दि. १४ डिसेंबर रोजी दत्तभक्त प्रमोद केणे यांच्या दत्तसाक्षात्काराचे प्रवचन आयोजित करण्यात आले आहे. हे प्रवचन सायंकाळी ५ ते रात्री ८.३० या वेळेत होणार आहे.

दत्तभक्त प्रमोद केणे यांनी आतापर्यंत गुजरात राज्याच्या जुनागड जिल्ह्यातील गिरनार पर्वताच्या ३०० पेक्षाही जास्त पौर्णिमा वारी केल्या आहेत. प्रवचनानंतर रात्री ८.३० ते १०.३० वाजेपर्यंत महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.

भाविकांनी या आध्यात्मिक पर्वणीचा व महाप्रसादाचा लाभ घ्यावा, असे आवाहन सद्‌गुरू श्री शंकर महाराज देवस्थान ट्रस्टच्या वतीने करण्यात आले आहे.

# शेतकऱ्यांच्या हितासाठी मी सभापती : संजय पवार



**मनमाड (भ्रमर वार्ताहर) :-** सभापती संजय पवार यांनी मनमाड बाजार समितीची बिकट परिस्थिती स्पष्ट करीत, राजकारणापेक्षा समिती आणि शेतकरी महत्त्वाचा आहे.

मी शेतकऱ्याचा मुलगा असून, बाजार समितीची परिस्थिती मजबूत करण्यासाठी काम करणार आहे, अशी ग्वाही मनमाड कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती संजय पवार यांनी दिली.

समितीची २२ वी वार्षिक सर्वसाधारण सभा नुकतीच मोठ्या उत्साहात पार पडली. यावेळी ते अध्यक्षस्थानावरून बोलत होते. यावेळी त्यांनी ऑनलाईन व्यवहार, शेतकरी भवन, पाणी, शौचालय, शेड, सीसीटीव्ही, मका खरेदी केंद्र, थकीत देयकांचा प्रश्न याबाबत ठोस आश्वासने दिली.

यावेळी संचालक किशोर लहाने, कैलास भाबड, सुभाष उगले, दादा बंब, रूपेश ललवाणी, रमेश कराड, विठ्ठल आहेर, शिवसेना तालुकाप्रमुख साईनाथ गिडगे, आप्पा कुणगर, अशोक डघळे व सुधीर देशमुख यांची प्रमुख उपस्थिती होती. सभेला शेतकरी, सरपंच, ग्रामपंचायत सदस्य, कार्यकारी संस्था प्रतिनिधी, हमाल-मापारी, कर्मचारी व व्यापारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. विरोधी गटातील एकही संचालक सभेला उपस्थित नव्हता.

पुढील महिन्यात ऑनलाईन व्यवहार सुरू करण्यात येणार असून शेतकऱ्याला विक्रीची माहिती तत्काळ मिळणार आहे. पावसाळ्यासाठी शेड, पाणीपुरवठ्याची सोय, शौचालय व्यवस्था, सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याचे नियोजन असल्याची माहिती त्यांनी दिली. आ. सुहास कांदे यांच्या माध्यमातून पाच कोटी रुपयांच्या शेतकरी भवनाला मंजुरी मिळाल्याचेही त्यांनी सांगितले.

हतबल न होता कर्मचाऱ्यांचे थकित पगार दिले जातील, व्यापाऱ्यांनी येथेच खरेदी करावी, अन्यथा कारवाई केली जाईल, असा इशाराही पवार यांनी दिला. ज्या शेतकऱ्यांचे पैसे मिळाले नसतील त्यांनी २४ तासांत तक्रार द्यावी, तत्काळ पैसे काढून दिले जातील, असे आश्वासन त्यांनी दिले. संचालक किशोर लहाने यांनी शेतकऱ्यांच्या कांदा व मका अनुदानासाठी प्रयत्न सुरू असल्याचे सांगून वखार महामंडळाची जागा समितीकडे वर्ग करण्याचा प्रस्ताव मांडला. लासलगावप्रमाणे बाजारभाव देण्याचा प्रयत्न केला जाईल, असेही ते म्हणाले.

शिवसेना तालुकाप्रमुख साईनाथ गिडगे यांनी आमदार सुहास कांदे यांच्या प्रयत्नातून हायटेक बाजार समिती उभी राहील, असा विश्वास व्यक्त केला, तर रमेश कराड यांनी बाजार समिती ही शेतकऱ्यांची हक्काची आई असल्याचे सांगत खासगी बाजारापेक्षा समितीकडेच लक्ष देण्याचे आवाहन केले.

सभेत विविध विषयांवरील ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आले. शेतकऱ्यांनी मका खरेदी केंद्र सुरू करणे, खत व युरिया उपलब्ध करून देणे, भाजीपाला लिलाव, कोल्ड स्टोरेजचा पाठपुरावा, पाणी व शौचालय सुविधा यासह अनेक सूचना मांडल्या.

सूत्रसंचालन सचिव बळीराम गायकवाड यांनी केले.

शैक्षणिक - बांसरी प्रशिक्षण

बांसरी प्रशिक्षण वर्ग



नवीन बॅचचा भव्य शुभारंभ

जानेवारी 2026 पासून

9765499969

प्रशिक्षक : अनिल कुटे

Only Whatapp Message, No Phone Call Pls

पत्ता : चिन्मय आश्रम, चिंचबन, मालेगाव स्टॅण्डजवळ, पंचवटी.

# प्रभाग क्रमांक २५ मध्ये ह. भ. प. इंदोरीकर महाराज यांचे कीर्तन संपन्न

**नवीन नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :-** प्रभाग २५ मधील नाईक मळा येथील श्री दत्त मंदिर येथे दत्त जयंती व कलशारोहण वर्षापूर्तीचे औचित्य साधत दत्त धाम सांस्कृतिक कला व क्रीडा मित्रमंडळातर्फे दत्तधाम चौकात महाराष्ट्र भूषण ह. भ. प. निवृत्ती महाराज देशमुख-इंदोरीकर यांचा परिसरातील नागरिकांसाठी भव्य कीर्तन सोहळा आयोजित करण्यात आला होता.

कीर्तनात नागरिकांना संबंधित करताना ह. भ. प. इंदोरीकर महाराज यांनी मोबाईलचा वापर कमी करून वेळेचे महत्त्व ओळखा, नशा व वाईट सवयींपासून लांब राहा, शिक्षण व संस्कार यांना प्राधान्य द्या, समाजकार्यात सहभागी व्हा आणि महत्त्वाचे म्हणजे आपल्या आई-वडिलांचा सन्मान करा, असे उपस्थित नागरिकांना सांगितले.

सोहळ्यास गायनाचार्य ह. भ. प. किरण शेटे, ह. भ. प. रोहिदास मते, ह. भ. प. भास्कर कान्हव, ह. भ. प. समाधान चुंभळे, मृदंग महामेरू ह. भ. प. किरण गोसावी, ह. भ. प. खुशाल महाराज, तसेच ह. भ. प. गोविंद शिरोळे व वारकरी संप्रदाय यांची सुवर्णसाथ लाभली.

या कीर्तन सोहळ्याचे आयोजन प्रभाग क्रमांक २५ मधील सामाजिक कार्यकर्त्या कविता नाईक व राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे युवा नेते अमोल नाईक यांनी आयोजित केले होते. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी अध्यक्ष रोहित नाईक, तसेच राजेंद्र काकळीज, हरिष महाजन, विजय खाडे व सदस्यांनी परिश्रम घेतले.




# अर्थतज्ज्ञ प्रमोद पुराणिक यांचे आज व्याख्यान

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :-** सार्वजनिक वाचनालय, नाशिक पुस्तक मित्रमंडळाचे व्याख्यानात सुमेध वडावाला (रिसबूड) यांनी लिहिलेल्या 'साठे' उत्तरांची कहाणी या पुस्तकावर अर्थतज्ज्ञ प्रमोद पुराणिक यांचे व्याख्यान आयोजित केले आहे.

हे व्याख्यान आज सायंकाळी ६ वाजता स्थळ स्वा. सै. गो. ह. देशपांडे उद्यान वाचनालय, गंगापूर रोड, आकाशवाणी टॉवरजवळ, नेर्लीकर हॉस्पिटलजवळ, उदयनगर लेन, नाशिक येथे होणार आहे. या व्याख्यानाचा लाभ नाशिककर नागरिकांनी घ्यावा, असे आवाहन वाचनालयाचे अध्यक्ष प्रा. दिलीप फडके, उपाध्यक्ष वैद्य विक्रांत जाधव, डॉ. सुनील कुटे, कार्याध्यक्ष संजय करंजकर, प्रमुख सचिव सुरेश गायधनी, सहाय्यक सचिव प्रा. सोमनाथ मुठाळ, ग्रंथसचिव देवदत्त जोशी, अर्थसचिव गिरीश नातू, पुस्तक मित्रमंडळाचे प्रमुख मंगेश मालपाठक, नाट्यगृह सचिव जयेश बर्वे, सांस्कृतिक सचिव जयप्रकाश जातेगावकर, वस्तुसंग्रहालय सचिव ॲड. अभिजित बगदे, कार्यकारी मंडळ सदस्य डॉ. धर्माजी बोडके, प्रेरणा बेळे, प्रशांत जुन्नरे, ॲड. भानुदास शौचे, समिती सदस्य रमेश कडलग, सुभाष सबनीस, सुहास टिपरे, लक्ष्मीकांत भट, श्रद्धा दुसाने, तसेच सार्वजनिक वाचनालयाच्या कार्यकारी मंडळाने केले आहे.

## जाहीर नोटीस

मी खालील सही करणार आज दि. १३/१२/२०२५ रोजी जाहीर करते की, माझा मुलगा **अथर्व राजेंद्र ढिकले** (अविवाहित) याचा मृत्यू दि. १/४/२०२५ रोजी झाल्याने त्याच्या नावावर असलेली टूव्हीलर गाडी क्रमांक **MH 15 KB 2503** माझ्या नावावर हस्तांतरित करणेकामी मी **श्रीमती विद्या राजेंद्र ढिकले** रा. कुंभार गल्ली, पिंप्री सय्यद, ता. जि. नाशिक वारस हक्कदार (आई) म्हणून मे. प्रादेशिक परिवहन अधिकारी, नाशिक यांच्याकडे अर्ज करीत आहे. सदर टूव्हीलर गाडी माझ्या नावावर हस्तांतरित करणेकामी कोणाची हरकत असल्यास सात दिवसांच्या आत समक्ष भेटून कळवावे किंवा मे. प्रादेशिक परिवहन अधिकारी, नाशिक यांच्याकडे लेखी संपर्क साधावा. सात दिवसांनंतर आलेल्या तक्रारीची दखल घेतली जाणार नाही. कळावे.

सही/-

**श्रीमती विद्या राजेंद्र ढिकले**

## प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी साहित्य सामुग्री खरेदीसाठी जाहीर ई-निविदा

जिल्हा आरोग्य विभाग, जिल्हा परिषद, नाशिक अंतर्गत प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी साहित्य सामुग्री खरेदीची आवश्यकता आहे. ही साहित्य सामुग्री नाशिक जिल्ह्यातील आदिवासी व बिगर आदिवासी क्षेत्रातील प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी भागात वापर केला जाईल. तरी इच्छुकांनी यासाठी आवश्यक ती दरपत्रके नमुने प्राप्त करण्यासाठी www.mahatender.govt.in या संकेत स्थळावर दि. १३/१२/२०२५ रोजी प्रसिद्ध करण्यात आलेल्या आहे. सदर निविदा नोंदणीकृत यांचेकडून मागविण्यात येत आहे. Online निविदा पद्धतीने दि. १३/१२/२०२५ ते २९/१२/२०२५ सायंकाळी १६.00 वाजेपर्यंत Download करता येईल. Online निविदा दाखल करण्याचा अंतिम दिनांक २९/१२/२०२५ सायंकाळी १६.00 वाजेपर्यंत असा आहे. कोरे निविदा फी इसारा रक्कमेचा धनाकर्ष (D. D) प्रत्यक्षरीत्या कार्यालयात सादर करण्याचा दि. २९/१२/२०२५ रोजी सकाळी १0.00 ते दुपारी २.00 वाजेपर्यंत स्वीकारला जाईल, याची निविदा धारकांनी नोंद घ्यावी. निविदे संबंधी सर्व माहिती व सविस्तर निविदा सूचना www.mahatender.govt.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहे. निविदा उघडण्याची दि. ३०/१२/२०२५ दुपारी ४.00 वाजता.

| सही/- | सही/- |
|---|---|
| जिल्हा आरोग्य अधिकारी<br>जिल्हा परिषद, नाशिक | मुख्य कार्यकारी अधिकारी<br>जिल्हा परिषद, नाशिक |

## आजचा वाढदिवस




**राजेश गडाख**
सामाजिक कार्यकर्ते

## उद्याचे वाढदिवस





**राजाभाऊ वाजे** – खासदार
**सुनील केदार** – सरचिटणीस, भाजप





**मंगेश पाटणकर** – माजी अध्यक्ष, निमा
**धनंजय निकाळे** – शहराध्यक्ष, सामाजिक, रा.काँ. न्याय विभाग





**नंदूभाऊ गायकर** – कर्मचारी महिला बँक
**अभिमन्यू सूर्यवंशी** – निवृत्त एसीपी



**प्रितीश बेदमुथा**
व्यावसायिक

# ऊर्जा बाल महोत्सव दिवस पहिला उत्साहात



**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :–** आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात हस्ताक्षराची मोहकता जपण्यासाठी प्रसिध्द कॅलिग्राफीक निलेश गायधनी व पूजा गायधनी यांच्या मार्गदर्शनाखाली कॅलिग्राफीच्या वर्कशॉपच्या माध्यमातून अक्षरांच्या सौंदर्याचा आणि अभिव्यक्तीच्या कलेचा अव्दितीय अविष्कार सादर करण्यात आला. लहान मुलांसोबत पालकांनी देखील या वर्कशॉपमध्ये भाग घेतला. कॅलिग्राफीचे विविध प्रकार, तंत्र आणि अक्षरांची मांडणी यांचे प्रशिक्षण घेतले.

कार्यशाळेत तज्ज्ञ प्रशिक्षकांनी देवनागरी व रोमन कॅलिग्राफी, स्ट्रोक तंत्र, ब्रश पेन वापर, अक्षरांतील समतोल, स्पॅसिन्ग, क्रीएटिव्ह लेटरिंग इत्यादी मुद्यांवर मार्गदर्शन केले. सहभागींना प्रत्यक्ष सराव करून घेत, अक्षरे सुंदर आणि आकर्षक दिसण्यासाठी कोणत्या गोष्टींकडे लक्ष द्यावे, याची माहिती देण्यात आली.

संगीतकार, लेखक व गायक डॉ. सलील कुलकर्णी यांचा 'मधली सुट्टी' गाणी, गप्पा हा कार्यक्रम मुलांसाठी व पालकांसाठी मेजवानी ठरला. लहान मुलांसोबत पालकांनी देखील या कार्यक्रमाचा सहभाग घेत आनंद लुटला. यावेळी लहान मुलांनी डान्स व मनसोक्त गप्पा मारून कार्यक्रमात धमाल केली. कार्यक्रमाची सुरुवात एस्पिलियर शाळेच्या मुलांनी सलील कुलकर्णी सरांसोबत प्रार्थना म्हणत सुरवात केली. स्मृतीउद्यानातील ॲडव्हेचर पार्क बघून पुन्हा एकदा लहान होऊन हे खेळ खेळावे असे त्यांनी सांगितले. नाशिककरांनी आपला मुलांसोबत या बाल महोत्सवाला भेट द्यावी, असे आवाहन केले.

उद्या बाल महोत्सवात वारली पेंटिंगच्या माध्यमातून संजय देवधर आदिवासी कलांचे तंत्र व मार्गदर्शन करणार आहेत. तसेच प्रसिद्ध कलाकार सत्यजित पाध्ये यांचा बोलक्या बाहुल्यांचा धमाल कार्यक्रमाचे आयोजन करण्यात असल्याची माहिती अजय बोरस्ते यांनी दिली.

# शासकीय कामकाजात अडथळा निर्माण केल्याप्रकरणी महिलेसह चार जणांविरुद्ध गुन्हा दाखल

**लासलगाव (भ्रमर वार्ताहर):–** लासलगाव ग्रामीण रुग्णालयात रुग्णावर उपचार करत असताना वैद्यकीय अधिकाऱ्यास आणि कर्मचाऱ्यांना अर्वाच्च भाषेत आरडाओरड आणि शिवीगाळ करून दमबाजी केल्याप्रकरणी शासकीय कामकाजात अडथळा निर्माण केल्याप्रकरणी लासलगाव पोलीस ठाण्यात विंचूर येथील महिलेसह चार जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत लासलगाव ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. बाळकृष्ण अहिरे यांनी फिर्याद दिली आहे.

या फिर्यादीत म्हटले आहे की, दि. २४ नोव्हेंबर २०२५ रोजी साडेतीन वाजेच्या सुमारास व दि. २७ नोव्हेंबर रोजी एक ते दोन वाजेच्या सुमारास ग्रामीण रुग्णालयात वैद्यकीय अधिकारी डॉ. बालकृष्ण अहिरे हे पेशंटवर उपचार करित असताना कविता कुमावत यांनी सांगितले की, तुम्ही माझ्या मुलाला तपासत नाही. सलाईन व इंजेक्शन का सोडत नाही, असे बोलून मोठमोठ्याने ओरडून मी सर्वांना बोलावून तुमचा तमाशा करते. तेव्हा महेश साळुंके (रा. लासलगाव), मोमीन (रा. विंचुर), शहेजाद रफिक पठाण उर्फ सोनू (रा. लासलगाव) यांना बोलावून घेतले. या सर्वांनी दवाखान्यात येवून आरडाओरडा करुन फिर्यादी व त्यांच्या इतर कर्मचाऱ्यांना अर्वाच्च भाषेत मोठ्याने बोलून तुम्ही पेशंटला का तपासत नाही व इंजेक्शन का सोडत नाही, तुम्हाला काय फुकटचा पगार आहे काय, असा जाब विचारत फिर्यादी व स्टाफला धमकावले तसेच शासकिय कामात अडथळा निर्माण केला.

यातील सोनू पठाण हा वारंवार ग्रामीण रुग्णालयात येवून येणाऱ्या पेशंटला रुग्णालयाबद्दल चुकीची माहिती देवून कर्मचाऱ्यांशी हुज्जत घालून धमकावत असतो. फिर्यादी हे आरोपींना समजावून सांगत होते की, पेशंटला योग्य प्रकारचे उपचार दिले जातात. पेशंटच्या तब्येतीनुसार इंजेक्शन दिले जातात, असे समजावून सांगत असताना चारही जणांनी शिवीगाळ केली व तुमची तक्रार तुमच्या वरिष्ठांना करतो असे धमकावले तेव्हा ग्रामिन रुग्णालयाचा सर्व स्टाफ हजर होता. त्यानंतर तुमच्या विरुद्ध सर्वोकडे तक्रार करु असा दम दिला व वाईटसाईट शिवीगाळ केली व सरकारी कामात अडथळा आणल्याप्रकरणी लासलगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला असून सहाय्यक पोलीस निरीक्षख भास्कर शिंदे, पोलीस हवालदार एस. आर. कदम तपास करीत आहेत.

# रामकाल पथचे काम साडेतीन महिन्यांत पूर्ण करण्याचे आव्हान

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी):** आगामी सिंहस्थाच्या पार्श्वभूमीवर महत्त्वाच्या रामकालपथचे काम मार्च २०२६ पर्यंत म्हणजे पुढील साडेतीन महिन्यांत पूर्ण करण्याचे आव्हान नाशिक महापालिकेसमोर आहे. त्यादृष्टिने नियोजन करण्यासाठी मनपा आयुक्त तथा प्रशासक मनीषा खत्री यांच्या उपस्थितीतबैठक झाली. त्यात हा निर्णय घेण्यात आला.

बैठकीला शहर अभियंता संजय अग्रवाल, कार्यकारी अभियंता प्रशांत पगार यांच्यासह सल्लागार उपस्थित होते. सिंहस्थाच्या दृष्टीने महत्त्वाच्या रामकालपथसाठी गोदाकाठ परिसरातील मंदिरांच्या रंगरंगोटीच्या कामांना प्रारंभ झाला असून, रामायणातील आकर्षक भित्तीचित्रे साकारण्यात येणार आहेत. पंचवटी, रामकुंड, गडकरी चौक परिसरातील हनुमान मंदिर, काळाराम मंदिर, तसेच गंगा घाटावरील प्राचीन देवस्थाने याठिकाणी रंगकाम, स्वच्छता आणि सौंदर्यीकरणाची कामे हाती घेण्यात आली आहेत. मंदिरांच्या भिंतींना भगवा आणि पिवळ्या रंगांच्या छटा देत पारंपरिक तसेच आकर्षक सजावट करण्यात येत आहे. रामकुंड, सीतागुंफा व काळाराम मंदिर परिसरात रामायणातील आकर्षक भित्तीचित्रे साकारण्यात येणार आहेत. महत्त्वाचे म्हणजे, मालेगाव स्टॅण्ड, इंद्रकुंड, काळाराम मंदिर, सीतागुंफा येथील प्रवेशद्वाराबरोबरच रामकुंड ते सरदार चौक ते काळाराम मंदिर ते सीतागुंफा येथे दगडी फरशा बसविण्यात येणार आहे. केंद्रीय पर्यटन मंत्री गजेंद्र सिंह शेखावत हे सोमवारी (दि.१५) नाशिक महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांकडून रामकाल पथच्या कामांबाबत ऑनलाइन आढावा घेणार आहेत. त्याबाबतही महापालिका आयुक्त खत्री यांनी अधिकाऱ्यांना सूचना दिल्या.

## रवी परीख यांची जिल्हाध्यक्षपदी निवड

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :–** महाराष्ट्रासह भारतभरातील जिवदया वाचविण्यासाठी राष्ट्रीय संत निलेश चंद्रमुनी यांनी जनकल्याण पार्टीची स्थापना केली आहे. यामध्ये गोमाता, कबुतर यासह मुक्या जनावरांची रक्षा करण्यासाठी प्रयत्न केले जाणार असल्याचा पार्टीचा उद्देश आहे. या पार्टीच्या नाशिक जिल्हाध्यक्षपदी रवी परीख यांची निवड करण्यात आली आहे. त्यांना राष्ट्रीय अध्यक्ष हार्दिक हुंडीया आणि राष्ट्रीय महामंत्री रमेश जैन यांच्या हस्ते नियुक्तीपत्र देण्यात आले आहे. त्यांच्या या निवडीचे सर्वस्तरातून स्वागत केले जात असून त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या आहे. जिल्हाध्यक्षपदी निवड झाल्यानंतर परीख यांनी मुक्या जनावरांचे संरक्षण करण्याचे आश्वासन देत समाजातील नागरिकांना या अभियानात भाग घेण्याचे आवाहन केले आहे.



## 'सुनहरे गीतों की दास्ता' उद्या मैफल

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी):–** जुन्या लोकप्रिय गाण्यांची मैफल 'सुनहरे गीतों की दास्ता' ही मैफल उद्या संध्याकाळी ६ वा. परशुराम सायखेडकर नाट्यगृहात आयोजित करण्यात आली आहे.

गायक उत्तम टाकळकर, संजय डेरे, राजेंद्र पवार, अरुण पठारे, उमेश मालवी, अर्चना सोनवणे, स्वाती जाधव, स्मिता पांडे, डॉ. रेखा सोनवणे, राधिका गांगुर्डे हे गाणी सादर करणार आहेत. दिनेश गोविल हे निवेदक आहे.

विनामूल्य मैफलीत भाग्यवान रसिक श्रोत्यांना पारितोषिके जिंकण्याची संधी आहे. रसिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन आयोजक उमेश मालवी व सहकाऱ्यांनी केले आहे.

# उद्यापासून भाजपच्या मनपासाठी इच्छुकांच्या मुलाखती

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :–** भारतीय जनता पक्षाच्या वतीने नाशिक महानगर- पालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी उमेदवार निवड प्रक्रियेचा महत्त्वाचा टप्पा म्हणून उद्या (दि. १४) ते १९ डिसेंबर या कालावधीत सर्व प्रभागांतील इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती घेण्यात येणार आहेत. एकूण १२२ प्रभागांसाठी ही प्रक्रिया राबविण्यात येत असून पक्ष संघटनात्मक मजबुतीसाठी ही मुलाखत प्रक्रिया महत्त्वाची आहे. पक्षाने दिलेल्या माहितीनुसार, खालील प्रभागांतील उमेदवारांची मुलाखत त्या त्या तारखांना घेतली जाणार आहे.



दि. १४ डिसेंबर–प्रभाग ७,१२,१३,१४, १५ डिसेंबर–प्रभाग १५,१६,२३,३०,१६ डिसेंबर–प्रभाग ८, ९, १०, ११, २४, २५, २६, १७ डिसेंबर – प्रभाग २७, २८, २९, ३१, १८ डिसेंबर – प्रभाग १, २, ३, ४, ५, ६, १९ डिसेंबर – प्रभाग १७, १८, १९, २०, २१, २२ याप्रमाणे इच्छुकांच्या मुलाखती घेण्यात येणार आहे. पक्षाच्या सूचनेनुसार मुलाखतीला येताना कोणत्याही प्रकारे शक्तिप्रदर्शन करू नये, तसेच मुलाखतीसाठी आवश्यक कागदपत्रे आणि भरलेली प्रश्नावली सोबत आणणे अनिवार्य आहे. तसेच एकाच कुटुंबातील अनेक सदस्य इच्छुक असतील किंवा एखाद्या उमेदवाराने वेगवेगळ्या प्रभागांमध्ये अनेक अर्ज भरले असल्यास, त्यांनी एकदाच निश्चित वेळेत मुलाखतीसाठी उपस्थित रहावे, असे निर्देश देण्यात आले आहेत.

या संपूर्ण प्रक्रियेचे समन्वय व मार्गदर्शन भाजप नाशिक कोअर कमिटी यांच्या नेतृत्वाखाली होत आहे. पक्षांतर्गत शिस्त, पारदर्शकता आणि संघटनात्मक निकषांच्या आधारे उमेदवारांची निवड केली जाणार आहे, असे केदार यांनी म्हटले आहे.

## मंचरला दोन बिबटे जेरबंद

**मंचर (भ्रमर वृत्तसेवा):–** मंचर वनपरिक्षेत्र हद्दीत जवळे आणि गांजवेवाडी या दोन ठिकाणी वनखात्याने लावलेल्या पिंजऱ्यात दोन मादी बिबटे जेरबंद झाले आहेत, अशी माहिती मंचर वनपरिक्षेत्र अधिकारी विकास भोसले यांनी दिली. आंबेगाव तालुक्यातील जवळे येथे बिबट्याचा उपद्रव वाढला होता. नागरिकांच्या मागणीनुसार लायगुडेमळा येथे बिबट्याला जेरबंद करण्यासाठी पिंजरा लावला होता.

# व्यापारी बँकेच्या उपाध्यक्षपदी आढाव



**नाशिकरोड (भ्रमर प्रतिनिधी) :–** नाशिक जिल्ह्याची अर्थवाहिनी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या नाशिकरोड–देवळाली व्यापारी सहकारी बँकेच्या उपाध्यक्षपदी ज्येष्ठ संचालिका कमल आढाव यांची बिनविरोध निवड झाली. बँकेचे ज्येष्ठ संचालक दत्ता गायकवाड, निवृत्ती अरिंगळे, बँकेचे अध्यक्ष अशोक चोरडिया यांच्या हस्ते त्यांचा सत्कार झाला.

मावळते उपाध्यक्ष डॉ. प्रशांत भुतडा यांची मुदत संपल्याने रोटेशननुसार कमल आढाव यांची निवड करण्यात आली. निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून इप्पर यांनी काम पाहिले. जनसंपर्क संचालक नितीन खोले, जगन आगळे, मनोहर कोरडे, सुधाकर जाधव, श्रीराम गायकवाड, प्रकाश घुगे, सुनील आडके, अरूण जाधव, गणेश खर्जुल, योगेश नागरे, वसंत अरिंगळे, विलास पेखळे, रामदास सदाफुले, रंजना बोराडे, बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राजेंद्र सोनार, उपमुख्य कार्यकारी अधिकारी एकनाथ कदम, बँक कर्मचारी प्रतिनिधी यशवंत पागेरे, मंगेश पडवळ, माजी नगरसेवक दिनकर आढाव, प्रशांत दिवे आदी उपस्थित होते.

## गिर्यारोहक सागर मराठे यांची आज शोकसभा

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :–** सुप्रसिद्ध गिर्यारोहक, साहसी खेळाडू आणि प्रशिक्षक सागर मराठे यांची श्रद्धांजली सभा आज सायंकाळी ५ वाजता शंकराचार्य न्यास संकुल, गंगापूर रोड येथील नानासाहेब ढोबळे सभागृहात होणार आहे. सागर मराठे यांचे नुकतेच निधन झाले. त्यांनी आरवायके महाविद्यालयात शिक्षण घेतले. जीएसके फार्मास्युटिकल कंपनीमध्ये ते कार्यरत होते. त्यांना ट्रेकिंग आणि रॉक क्लाइंबिंगची आवड निर्माण झाली. दार्जिलिंग येथील हिमालयन माऊन्टेनिअरिंग इन्स्टिट्यूटमध्ये गिर्यारोहणाचा प्राथमिक अभ्यासक्रम त्यांनी पूर्ण केला.



# प्रेस मजदूर संघातर्फे शरद पवारांना अनोखी भेट




**नाशिकरोड (भ्रमर प्रतिनिधी) :–** राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांच्या ८६ व्या वाढदिवशी त्यांना मुंबईत नाशिकरोडच्या करन्सी नोट प्रेस आणि इंडिया सिक्युरिटी प्रेस मजदूर संघातर्फे सरचिटणीस जगदीश गोडसे यांनी अनोखी भेट दिली.

शरद पवार यांना स्वातंत्र्यपूर्व काळातील जॉर्ज सहाव्या कालखंडातील १५० चांदीच्या व चलनी नाण्यांचा संच देण्यात आला. छत्रपती शिवाजी महाराज, संत तुकाराम, महात्मा गांधी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याचा गौरव म्हणून केंद्र शासनाने जी नाणी तयार करून चलनात आणली या नाण्यांमध्ये शरद पवारांची शेतकरी राजा म्हणून एक प्रतिमा तयार करून त्यांचा एक फोटो त्यामध्ये लावून त्यांना तो भेट देण्यात आला. मजदूर संघाने हा संच भेट देऊन त्यांच्या नेतृत्त्वाचा वेगळ्या प्रकारे सन्मान केला. यावेळी प्रेस मजूदर संघाचे सुंदर रमण, अण्णा सोनवणे, संदीप व्यवहारे, संतोष कटाळे, राजाभाऊ लहांगे, सुनील नाईक, सचिन दिवटे, सचिन चिडे, सोमनाथ काळे, विनोद घाडगे, प्रवीण निकुंभ, हिरामण आव्हाड, आप्पा जगताप, मच्छिंद्र जाधव आदी उपस्थित होते. या अनोख्या भेटीत कृतज्ञता व्यक्त करताना शरद पवार म्हणाले, की स्वातंत्र्यपूर्व काळातील ही नाणी केवळ ऐतिहासिकच नाहीत, तर भारताच्या आर्थिक प्रगतीचा वारसा जतन करण्याचे प्रतिक आहे. जगदीश गोडसे म्हणाले की, शरद पवार हे देशाच्या विकासासाठी योगदान देणाऱ्यांचे प्रेरणास्थान आहे. ही भेट त्यांच्या कार्याचा आदर व्यक्त करण्यासाठी आहे. दरम्यान, शरद पवार यांचा वाढदिवस साजरा करण्यासाठी अनेक मान्यवर उपस्थित होते. मात्र, आय.एस.पी. मजदूर संघाने दिलेली ही ऐतिहासिक भेट सर्वांचे आकर्षण ठरली. या नाण्यांमध्ये स्वातंत्र्यपूर्व भारताच्या आर्थिक इतिहासाचा एक महत्त्वाचा भाग झळकतो.

# इंदूर-पुणे राष्ट्रीय महामार्गावर तीन ठिकाणी वेगवेगळी वाहने बंद पडल्याने वाहतूक कोंडी



**मनमाड (भ्रमर वार्ताहर) :–** इंदूर–पुणे राष्ट्रीय महामार्गावर तीन ठिकाणी वेगवेगळी वाहने बंद पडल्याने मनमाड परिसरात पुन्हा एकदा वाहतूक कोंडी निर्माण झाली.

सकाळपासूनच या महामार्गावर वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्याने कामावर जाणारे नागरिक, शाळकरी मुले तसेच वाहतूकदारांना मोठा मनस्ताप सहन करावा लागला. शहरातील रेल्वे रुग्णालयाजवळ एमएच १८ बीझेड १२८८ क्रमांकाची पुणे–धुळे प्रवासी बस अचानक बंद पडली. सकाळी गर्दीच्या वेळी बस मध्य रस्त्यात थांबल्याने वाहतूक संथ झाली. याचदरम्यान येवल्याकडून मालेगावच्या दिशेने जाणारा एक ट्रकही तांत्रिक बिघाडामुळे रस्त्यात बंद पडला. त्यामुळे आधीच वाढलेल्या वाहतूक कोंडीत आणखी भर पडली. दरम्यान, इंदूर–पुणे राष्ट्रीय महामार्गावरील जळगाव चोंडी घाटात इंधनाने भरलेला टँकर तांत्रिक बिघाडामुळे बंद पडला. घाटातील अरुंद वळणांमुळे वाहने पुढे सरकणे अधिक कठीण झाले आणि या मार्गावरील वाहतूक पूर्णपणे विस्कळीत झाली.

एकाच दिवशी तीन ठिकाणी वाहने बंद पडल्यामुळे रस्त्यावर प्रचंड गोंधळाचे वातावरण निर्माण झाले. शाळा, ह्न कॉलेजला जाणाऱ्या विद्यार्थ्यांना उशीर झाला. तर कामगार व व्यावसायिक वर्गालाही वाहतूक कोंडीचा फटका बसला. तिन्ही ठिकाणच्या बिघाडामुळे महामार्गावरील कोंडी बराच काळ कायम राहिली. वाहतूक कोंडी टाळण्यासाठी पर्यायी मार्ग निर्माण करण्याची मागणी मनमाडकरांकडून केली आहे.

# भरधाव ट्रकच्या धडकेत १७ वर्षीय युवक ठार

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :–** दुचाकीवरून जाणाऱ्या दोघांना भरधाव ट्रकने दिलेल्या धडकेत एका युवकाचा मृत्यू झाला असून, एक जण जखमी झाल्याची घटना सिन्नर फाटा परिसरात घडली.

याबाबत पोलिसांनी दिलेली अधिक माहिती अशी, की फिर्यादी साजिद सलीम बागवान (वय ४५, रा. देवळाली गाव) यांचा मुलगा सोहेल साजिद बागवान (वय १७) व भाचा सायम बागवान (वय १६, रा. मदनी अपार्टमेंट, सुभाष रोड, नाशिकरोड) हे ३ डिसेंबर रोजी रात्री १०.३० वाजेच्या सुमारास एमएच १५ एचएस ८८८२ या क्रमांकाच्या होंडा युनिकॉर्न दुचाकीवरून अरिंगळे मळा, नाशिकरोड येथून नाशिकरोडकडे जात होते. त्यावेळी सिन्नर फाट्याकडून टाटा कंपनीची एमएच १७ एजी १५५६ या क्रमांकाची टाटा मॅजिक ट्रक ही भरधाव वेगात येत होती.

ट्रक चालकाने सोहेल यांच्या दुचाकीला मध्यभागी जोरदार धडक दिल्याने ते दोघे रस्त्यावर पडले. या अपघातात सोहेलच्या उजव्या गालाला, मणक्यास व डोक्याला गंभीर दुखापत झाल्याने त्यात त्याचा मृत्यू झाला. दुचाकीवर मागे बसलेला सायन याच्या उजव्या पायाच्या गुडघ्याला गंभीर दुखापत झाली असून त्याच्यावर उपचार सुरू आहेत. याप्रकरणी बागवान यांच्या फिर्यादीवरून टाटा मॅजिक ट्रकचालक अशोक पांडुरंग मालकर याच्याविरुद्ध नाशिकरोड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास पोलीस हवालदार सानप करीत आहेत.

# दिव्यांग मुलांच्या क्रीडा स्पर्धा उत्साहात संपन्न



**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :–** महानगरपालिका आयुक्त मनीषा खत्री, अतिरिक्त आयुक्त करिश्मा नायर आणि प्रदीप चौधरी, उपायुक्त समाज कल्याण एन.व्ही. नायर आणि शिक्षण अधिकारी डॉ. मीता चौधरी यांनी महानगरपालिका आणि खासगी शाळांमधील अपंग मुलांसाठी क्रीडा स्पर्धा आयोजित केल्या होत्या.

या स्पर्धा पंचवटीतील क्रिडा संकुल येथे पार पडल्या. यामध्ये महानगरपालिका शाळा क्रमांक ८५, इयत्ता पहिलीची विद्यार्थिनी शेख अलिना अमीन द्वितीय आली. यावेळी सर्व पर्यवेक्षक आणि शाळा क्रमांक ८४ च्या मुख्याध्यापिका आणि केंद्रप्रमुख खान नाज परवीन, तबस्सुम शेख, निलोफर शेख, वसीमा शेख, अफजा काझी, बेबी फातिमा, शर्मीन अन्सारी, आमना काझी, शाहना खान आणि आफरीन पटेल यांनी परिश्रम घेतले. नाशिक येथील वडाळा गावातील महानगरपालिका उर्दू शाळा क्रमांक ८५ येथे शालेय स्तरावरील क्रीडा स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. यावेळी शालेय स्तरावरील क्रीडा स्पर्धेचे उद्घाटन केंद्र क्रमांक ५ च्या अधीक्षक खान नाज परवीन यांच्या हस्ते करण्यात आले.

प्राचार्य तबस्सुम खान व सर्व शिक्षक कर्मचारी, रवीश मिर्झा, शाएश्ता खान, आफरीन काझी, मुल्ला शबनम, तहसीन शेख, तहसीन सौदागर, शेख नोशीन, मोमीन शबिना, शेख समरीन, शेख साबा, शेख शाहीन, शेख रिजवाना उपस्थित होते.

# त्र्यंबकेश्वरला मंगळवारी दिव्यांग वैद्यकीय प्राथमिक तपासणी शिबिर

**त्र्यंबकेश्वर (भ्रमर वार्ताहर):–** इगतपुरी व त्र्यंबक तालुक्यातील दिव्यांग व्यक्तींचे प्राथमिक तपासणी शिबिर मंगळवारी (दि.१६) सकाळी १० वा. आयोजित करण्यात आले आहे. पंचायती श्री निरंजनी आखाडा भक्त निवास मंगल कार्यालय व लॉन्स, स्वामी समर्थ मंदिर रोड, त्र्यंबकेश्वर येथे हे शिबीर होत आहे.

या शिबिरात तज्ज्ञ डॉक्टर उपस्थित राहणार असून त्यात अस्थिरोग, नेत्र विभाग, नाक–कान–घसा, मानसोपचार, फिजीओथेरपी, डीईआयसी, हिमटोलॉजी आदी तज्ज्ञ डॉक्टर उपस्थित राहणार आहेत. या शिबिरामध्ये दिव्यांग लाभार्थ्यांना युडीआयडी कॉर्ड काढण्यासाठी मार्गदर्शन केले जाणार आहे. त्यासाठी आधार कार्ड, रेशन कार्ड, पासपोर्ट साईज फोटो, शालेय विद्यार्थी असल्यास बोनाफाईड प्रमाणपत्र सोबत आणणे आवश्यक आहे.


## क्रांतिवीर वसंतराव नारायणराव नाईक शिक्षण प्रसारक संस्था, नाशिक

क्रांतिवीर वसंतराव नाईक मार्ग, कॅनडा कॉर्नर, शरणपूर रोड, नाशिक

रजि. नं. एफ - ५ मो. ९२७२१७५९८२
जावक क्र. ३०६/२०२५ दिनांक : १२/१२/२०२५

### वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना

(फक्त सभासदांकरिता)

सप्रेम नमस्कार वि.वि.

संचालक मंडळाच्या सुचनेवरुन क्रांतिवीर वसंतराव नारायणराव नाईक शिक्षण प्रसारक संस्थेची **वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार, दि. २८/१२/२०२५ रोजी दुपारी २.०० वाजता** संस्थेच्या कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय नाशिक येथे संस्थेचे अध्यक्ष **मा. श्री. कोंडाजीमामा रावबा आव्हाड** यांचे अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आलेली आहे. तरी सर्व सभासदांनी सभेस उपस्थित रहावे. ही नम्र विनंती.

**- विषय -**

१) मागील वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.
२) क्रांतिवीर वसंतराव नारायणराव नाईक शिक्षण प्रसारक संस्थेचा सन २०२४–२५ चा वार्षिक अहवाल वाचून मंजूर करणे.
३) सन २०२४–२०२५ चे क्रांतिवीर वसंतराव नारायणराव नाईक शिक्षण प्रसारक संस्थेच्या मध्यवर्ती कार्यालयाचे व सर्व शाखांचे एकत्रित खर्च उत्पन्न पत्रके व ताळेबंद पत्रके यांना मंजुरी देणे.
४) सन २०२५–२०२६ चे क्रांतिवीर वसंतराव नारायणराव नाईक शिक्षण प्रसारक संस्थेच्या मध्यवर्ती कार्यालयाचे व सर्व शाखांच्या एकत्रित अंदाजपत्रकास मंजुरी देणे.
५ ) सन २०२५–२०२६ साठी हिशोब तपासणीसाची नेमणूक करणे.
६) संस्थेच्या घटना दुरुस्ती बाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणे.
७) मा. अध्यक्षांचे परवानगीने ऐनवेळी येणाऱ्या विषयांवर विचार विनिमय करुन निर्णय घेणे.

आपला विश्वासू
**(श्री. हेमंत हरिभाऊ धात्रक)**
सरचिटणीस, क्रांतिवीर वसंतराव नारायणराव नाईक शिक्षण प्रसारक संस्था, नाशिक

टिप:
१) सभासदांना काही सूचना व प्रश्न करावयाचे असल्यास ते लेखी स्वरुपात वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना प्रसिद्ध झाल्यापासून ते दिनांक २३/१२/२०२५, दुपारी ३.०० वा. पर्यंत संस्थेच्या कार्यालयात वेळेत द्याव्यात.
२) सर्व सभासदांना अहवाल पाठविणे, पोटनियमाप्रमाणे शक्य नसल्याने सभासदांना विनंती की, अहवाल व आर्थिक पत्रके पहावयाची असल्यास कार्यालयीन वेळेत, सुट्टीचे दिवस सोडून दुपारी १.०० ते ३.०० या वेळेत दिनांक १९/१२/२०२५ ते २५/१२/२०२५ पर्यंत संस्थेच्या मध्यवर्ती कार्यालयात बघावयास मिळतील.
३ ) कोरम पूर्ण न झाल्यास अर्ध्या तासानंतर त्याच दिवशी, त्याच ठिकाणी सभा सुरू होईल.



हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक संपादक श्री. चंदुलाल शाह यांनी चैतन्य आर्ट्स, सीताराम चेंबर्स, पेठ फाटा, पंचवटी, नाशिक-३ येथे छापून भ्रमर कार्यालय, सीताराम चेंबर्स, पेठ फाटा, पंचवटी, नाशिक -३ येथे प्रसिद्ध केले. दूरध्वनी २५१४६५०, २५११७६०
E-Mail-daily_bhramar@rediffmail.com नाशिकरोड संपर्क कार्यालय, बिटको क्लासिक, मुक्तिधाम समोर, नाशिकरोड, दूरध्वनी २४५६५४९. कार्यकारी संपादक- हितेश चंदुलाल शाह ✻ पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.
Printed, Published and Owned by Shri. Chandulal Shah and printed at Chaitanya Arts, Sitaram Chambers, Peth Phata, Panchavati, Nashik-3 and published at Daily Bhramar, Sitaram Chambers, Peth Phata, Panchavati, Nashik-3. ✻ Editor : Chandulal Shah ✻ Executive Editor : Hitesh Chandulal Shah.